# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०२५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक ०८ जुलै, २०२५ / आषाढ १७, १९४७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्य मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या – ४३**

---

### बीड येथे मुलीने अत्याचाराला कंटाळून आत्महत्या केल्याबाबत

**(१) * ८१६६ श्री.मनोज जामसुतकर (भायखळा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड येथे एका मुलीची काही मुलांनी छेडछाड करुन तिला धमकावून अनैतिक कृत्य केल्यानंतर जबरदस्ती छायाचित्र व चित्रफित (Video & Photo) काढल्याने मुलीने धाराशिव येथे मामाच्या घरी जाऊन दिनांक १४ मार्च, २०२५ रोजी वा त्यासुमारास गळफास घेऊन आत्महत्या केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी पिडीत मुलीच्या नातेवाईकांनी धाराशिव शहर पोलिस ठाण्यात तसेच पिडित मुलीच्या आईने मा.उपमुख्यमंत्री यांचेकडे पत्राद्वारे पिडीत मुलीच्या आईने पत्राद्वारे तक्रार करुन अत्याचार करणाऱ्या दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणी पीडितेच्या आईने दिलेल्या फिर्यादीनुसार धाराशिव शहर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १२०/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम १०८, ३(५) सह अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम, १९८९ कलम ३(१)(r) अन्वये दिनांक १८.०३.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(२) उपलब्ध माहितीच्या आधारे सदर निवेदनाचा शोध घेतला असता, अशा प्रकारचे निवेदन मा.उपमुख्यमंत्री कार्यालयास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. तथापि, सदर विषयाबाबत एका सामाजिक संघटनेचे पत्र मा.मुख्यमंत्री कार्यालयास प्राप्त झाले आहे.

(३) व (४) सदर प्रकरणी दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यापैकी आरोपी क्रमांक १ यास दिनांक ०३.०४.२०२५ रोजी अटक करण्यात आली असून दिनांक १६.०४.२०२५ रोजी मा.न्यायालयाने जामीन मंजूर केला आहे. आरोपी क्रमांक २ हीस मा.न्यायालयाने दिनांक १३.०६.२०२५ रोजी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## दापोडी (जि.पुणे) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यशाळेतील भांडार खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराबाबत

**(२) * ९२६९ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दापोडी (जि.पुणे) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यशाळेतील भांडार खरेदीत झालेल्या गैरव्यवहाराचे प्रधान महालेखापाल यांच्यामार्फत विशेष लेखा परीक्षण करण्याबाबत शासनाने अद्यापही निर्णय घेतला नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१० ते २० या कालावधीत काम केलेल्या दोन अधिकाऱ्यांच्या विरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी सुरू केली असून अन्य ठिकाणी देखील त्या अधिकाऱ्यांनी केलेल्या गैरव्यवहाराच्या तक्रारी विभागाकडे प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माजी महाव्यवस्थापक (भां. व ख.) व विद्यमान वरिष्ठ भांडार अधिकारी, चिकलठाणा, मध्यवर्ती कार्यशाळा यांच्याविरोधातील अन्य तक्रारींबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने चौकशी सुरू केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) रा.प मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी पुणे येथील भांडार खरेदी बाबत सहाय्यक लेखा परिक्षण अधिकारी, रा.प.अंतर्गत लेखा परिक्षण पथक, पुणे यांच्याकडून विशेष लेखा परिक्षण करण्यात आले.

(२), (३), (४) व (५) सदर प्रकरणी अनियमीतता झाल्याची बाब दिसून आली. त्यामधील संबंधितांविरुध्द प्रमादिय कारवाई केली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागास प्राथमिक माहिती उपलब्ध करुन देण्यांत आली असून, सद्यस्थितीत ला.प्र.वि. यांचेकडून अंतिम अहवाल अप्राप्त आहे.

तसेच वरिष्ठ भांडार अधिकारी, चिकलठाणा, मध्यवर्ती कार्यशाळा,छत्रपती संभाजीनगर यांचे विरुद्ध रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे, व सातारा विभागांतर्गत कार्यरत असतांना झालेल्या अनियमितते प्रकरणी रा.प.महामंडळाकडून चौकशी प्रस्तावित करण्यांत आलेली आहे.

-----------------

**परळी (जि.बीड) येथील औष्णिक विद्युत केंद्रातील ९ वा संच मंजूर करुन सौर ऊर्जा प्रकल्प सुरू करण्याबाबत**

**(३) * ७१४५ श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परळी (जि.बीड) येथील औष्णिक विद्युत केंद्रातील जुन्या संचांच्या ऐवजी नवीन औष्णिक केंद्रासाठी ९ वा संच उभारण्याचा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठविण्यात आला असूनही त्यास अद्यापपर्यंत मंजुरी मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, परळीतील औष्णिक केंद्रातील संच क्रमांक ९ मंजूर न झाल्यामुळे वीज निर्मितीची कार्यक्षमता कमी होत असल्याने त्याच्या उत्पादनावर परिणाम होत आहे, त्यामुळे रोजगाराच्या संधी मर्यादित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच परळी औष्णिक केंद्राच्या पर्यायी वापरासाठी सौर ऊर्जा प्रकल्प प्रस्तावित असूनही या योजनेचा कार्यान्वयन आराखडा राज्य शासनाकडून सादर करण्यात आलेला नसल्यामुळे हरित ऊर्जा उत्पादनास चालना मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने परळी औष्णिक व सौर ऊर्जा प्रकल्पांबाबत केंद्र शासनाकडून मंजुरी मिळण्यासह प्रकल्प त्वरीत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

परळी औष्णिक विद्युत केंद्रामध्ये सुपर क्रिटीकल ६६० मे.वॅ. क्षमतेच्या संचासाठी पाणी, कोळसा इ. ची उपलब्धता नाही. वीजनिर्मितीसाठी येणारा खर्च अधिक असल्याने Merit Order Dispatch च्या निकषात बसत नाही. त्यामुळे सद्य:स्थितीत ९ वा संच उभारण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

(२) सद्य:स्थितीत संच क्रमांक ६, ७ व ८ हे सुरू असल्याने परळी औष्णिक विद्युत केंद्राच्या कार्यक्षमतेवर व रोजगारावर कुठलाही परिणाम दिसून येत नाही.

(३) व (४) परळी औष्णिक केंद्राच्या पर्यायी वापरासाठी २० मेगावॅट क्षमतेच्या सौर ऊर्जा प्रकल्पास दि.२९.०९.२०२१ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. याबाबतचे काम मेसर्स स्वरयू एनर्जी लिमिटेड यांना देण्यात आले असून त्यासाठी आवश्यक जमीन ३०.३६ हेक्टर उपलब्ध करुन देण्यात आली आहे. काम प्रगतीपथावर असून प्रकल्प दि.३० नोव्हेंबर, २०२५ पर्यंत कार्यान्वित होणे अपेक्षित आहे.

(५) लागू नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघातील केंद्रिय भविष्य निर्वाह निधीमध्ये करण्यात आलेला गैरव्यवहार**

**(४) * ८८९८ श्री.चेतन तुपे (हडपसर), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य सहकारी दूध महासंघातील सन २०१९ ते २०२१ या कालावधीत केंद्रिय भविष्य निर्वाह निधीमध्ये वरिष्ठ सामाजिक सुरक्षा अधिकारी व डेअरीमधील दोन कर्मचाऱ्यांनी भविष्य निर्वाह निधी विभागातील अधिकाऱ्यांसोबत संगनमत करुन कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार केला असल्याचे दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त अधिकारी व कर्मचारी यांनी एकूण ६७ प्रकरणातील २ कोटी २९ लाख रुपयांचे दावे निकालात काढून त्या बदल्यात लाखो रुपये घेतल्याची तक्रार केंद्रिय अन्वेषण विभागाकडे दिनांक २४ एप्रिल, २०२५ रोजी केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अतुल सावे :** (१), (२) व (३) होय, हे खरे आहे. सदरचे प्रकरण हे भविष्य निर्वाह निधी कार्यालय, श्रम व रोजगार मंत्रालय, भारत सरकार या विभागाशी संबंधित आहे. यास्तव सदर प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभाग (सीबीआय), भ्रष्टाचार विरोधी शाखा (एसीबी), मुंबई यांच्याकडे दि.१८.०३.२०२५ रोजी FIR दाखल केलेला आहे. याबाबतचा पुढील तपास सीबीआय मार्फत चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वणी (जि.यवतमाळ) तालुक्यात कोळसा खाणीमुळे**
**शेतीपिकांचे होणारे नुकसान रोखण्याबाबत**

**(५) * ११०९६ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **खनिकर्म मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (जि.यवतमाळ) तालुक्यात कोलगाव, शिंदोला रस्त्यालगत असलेल्या शेतीपिकांचे कोळसा वाहतुकीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, नुकसानीचे पंचनामे करुन नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देण्याची मागणी ग्रामस्थांनी वारंवार स्थानिक प्रशासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) तसेच, घोन्सा येथील खुल्या कोळसा खाणीत केल्या जाणाऱ्या बेकायदेशीर स्फोटामुळे घोन्सा येथील सार्वजनिक मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून नागरिकांच्या जीवाला धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी वारंवार तक्रारी करुनही वेस्टर्न कोलफिल्ड प्रशासन कोळसा खाणीत अतितीव्रतेचे स्फोट करुन कोळशाचे उत्खनन करीत असल्याबाबत ग्रामस्थांनी वेस्टर्न कोलफिल्डच्या उत्तर क्षेत्राच्या क्षेत्रिय महाप्रबंधकाकडे माहे मे, २०२५ मध्ये लेखी निवेदनाव्दारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यासह बेकायदेशीर स्फोट करणाऱ्या संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) जिल्हा कृषि अधिक्षक, यवतमाळ यांच्या अहवालानुसार, ज्या-ज्या रस्त्यावरुन कोळसा वाहतूक होते, त्या रस्त्याच्या आजूबाजूला असलेल्या शेतपिकांचे कोळसा वाहतुकीमुळे नुकसान झालेले आहे.
(२) सद्य:स्थितीत कोळसा वाहतुकीमुळे होणाऱ्या शेतपिकांच्या नुकसानीसंदर्भात, भरपाई कोणत्या पध्दतीने व किती द्यावी, याबाबत शासनाचे धोरण नाही. याअनुषंगाने, कोळसा वाहतुकीमुळे होणाऱ्या शेतपिकाच्या नुकसानीबाबत द्यावयाचे सानुग्रह अनुदानाबाबत धोरण ठरविण्यासाठी अपर मुख्य सचिव (मुख्यमंत्री सचिवालय) यांचे अध्यक्षतेखाली मदत व पुनर्वसन विभागाच्या दिनांक ०९/०६/२०२५ च्या शासन निर्णयान्वये समिती गठीत केलेली आहे.

तथापि, यापूर्वी अशा प्रकारच्या प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, जिल्हा कृषी विभागाने, माहे सप्टेंबर-ऑक्टोबर २०२३ मध्ये वणी तालुक्यातील शिरपूर ते आबई फाटा या भागात नुकसानीचे पंचनामे केले होते. त्यानंतर दिनांक २९ जानेवारी, २०२५ रोजी डॉ.पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठामार्फत तयार करण्यात आलेल्या तांत्रीक गटामार्फत, पंचनामा करण्यात आलेल्या वरील ठिकाणावरुन घेतलेले मातीचे नमुने दिनांक ११/०२/२०२५ रोजी "नेरी" या संस्थेकडे तर, कपाशीचे नमुने दिनांक १७/०२/२०२५ रोजी CIRCOT, ओटाई प्रशिक्षण केंद्र, नागपूर यांचेकडे रासायनिक पृथ:करण करण्यासाठी पाठविण्यात आलेले आहेत. याबाबतचा अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही. अहवाल प्राप्त होताच, नुकसान भरपाई निश्चित करुन, वेकोलीमार्फत शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही जिल्हा कृषी विभागाकडून केली जाईल.

(३) हे खरे नाही.

क्षेत्रीय महाप्रबंधक वणी नॉर्थ क्षेत्र, वेस्टर्न कोलफिल्ड यांच्या अहवालानुसार घोंसा येथील खुल्या कोळशाच्या खाणीमध्ये (Open Cast Mine) महानिदेशक, खाण सुरक्षा (Director General of Mines Safety) यांच्या परवानगीने व निश्चित केलेल्या सुरक्षाविषयक मानकानुसार नियंत्रीत स्फोटाद्वारे कोळसा उत्खनन केले जाते. नियंत्रित स्फोटामुळे निर्माण होणारी कंपणे ही अनुज्ञेय मर्यादेपेक्षा कमी आहेत.

(४) याअनुषंगाने, स्थानिक ग्रामस्थांनी वेकोली प्रशासनाकडे लेखी निवेदनाद्वारे दिलेल्या तक्रारीवर या ठिकाणच्या असलेल्या वस्तुस्थितीसंदर्भात वेकोली प्रशासनाकडून उत्तर देण्यात आलेले आहे.

(५) व (६) कोळसा वाहतुकीमुळे, कोलगाव, शिंदोला रस्त्यालगतच्या शेतपिकांच्या नुकसानीसंदर्भात, जिल्हा कृषि अधिकारी, यवतमाळ यांनी नुकसानीचे पंचनामे केले असून, यासंबंधी पुढील कार्यवाही सुरु आहे. वेकोलीच्या कोळसा खाणीमध्ये नियमानुसार नियंत्रीत स्फोटाद्वारे खनिज उत्खनन केले जात असल्याने कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे येथील रतनशी प्रेमजी ट्रस्टच्या सदस्यांनी बनावट दस्तावेज व बँक गॅरंटी सादर करुन केलेला गैरव्यवहार

**(६) * १०९५५ डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.संजय पोतनीस (कलिना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे येथील रतनशी प्रेमजी चॅरिटेबल ट्रस्टचे सदस्य डॉ.निखील माखेचा यांनी बनावट दस्तावेज व बँक गॅरंटी सादर करुन सबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्या संगनमताने ट्रस्टच्या मालकीच्या वडवली व ओवळे (ठाणे) येथील अनुक्रमे २७ व ६५ एकर जमीनीची बेकायदेशीर विक्री करुन कोट्यवधी रुपयांचा आर्थिक गैरव्यवहार करुन शासनाचे हजारो कोटी रुपयांचे नुकसान केल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी ट्रस्टचे सदस्य डॉ.अनिरुध्द माखेचा व लोकप्रतिनिधींनी दिनांक १३ मार्च, २०२५ (ईऑक्र. ८०३२६५१) व दिनांक २० मे, २०२५ रोजी वारंवार तक्रारी करुन आर्थिक गुन्हे शाखेकडून उच्चस्तरीय सखोल चौकशी करुन कारवाई करण्याची तसेच ट्रस्ट बरखास्त करुन त्यावर प्रशासक नेमण्याची मागणी मा.वि.प. नेता (विधानपरिषद) यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रश्नी चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

मा.डॉ. जितेंद्र आव्हाड, आमदार तसेच रतनशी प्रेमजी चॅरिटेबल ट्रस्टचे पुर्वाश्रमीचे ट्रस्टी डॉ.अनिरुध्द निखिल माखेचा यांचे तक्रार अर्ज पोलीस कार्यालयास प्राप्त झाले होते.

तसेच मा.वि.प.नेता (विधानपरिषद) यांनी प्रशासक नेमण्याची मागणी मा.मुख्यमंत्री महोदयांकडे केली आहे.

(३) याबाबत पोलीस यंत्रणेमार्फत चौकशी क्र.७८/२०२५ अन्वये प्राथमिक चौकशी सुरु आहे.

तसेच सदर प्रकरणी मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती अपील (SLP) क्र.९८३४, ९८१८, ९८०१ आणि ९८५०/२०२५ मध्ये दि.१५/०४/२०२५ च्या आदेशान्वये "जैसे थे" (Status quo) आदेश दिले असल्याने प्रशासक नेमणूक करण्याबाबत कार्यवाही अद्याप करण्यात आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**बीड शहरात अखंडीत स्वरुपात विद्युत पुरवठा सुरु ठेवण्याबाबत**

**(७) * ८६९० श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड (जि.बीड) शहरातील विद्युत समस्यांचे निराकरण करण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या ४८ कंत्राटदारांकडून दुरुस्तीची कामे विहित मुदतीत न केल्यामुळे शहरातील विद्युत पुरवठा वारंवार खंडीत होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवर किंवा रस्त्याच्या मधोमध उघडे रोहित्र व गंजलेले व वाकलेले विद्युत खांब यांना रात्रीच्या वेळेस धडकून मोठ्या प्रमाणावर वाहनधारक जखमी झाल्याच्या घटना घडत असल्याने लोंबणाऱ्या विद्युत तारा, एलटी लाईन, ३३ के.व्ही. ११ के.व्ही. उच्चदाब वाहिन्या अशा विविध कामांच्या देखभाल व दुरुस्तीसाठी कत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, धारुर तालुक्यातील तेलगाव येथील १३२ के.व्ही. सबस्टेशन मध्ये स्फोट होवुन उक्त गावांमध्ये ३ दिवस विद्युत पुरवठा बंद असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वारंवार पत्राद्वारे, दुरध्वनीद्वारे व दौऱ्यादरम्यान समक्ष महावितरणच्या संबंधित अधिकारी यांना सूचना केल्या असताना देखील याकडे दुर्लक्ष केले असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह शहरातील विद्युत पुरवठा अखंडीत स्वरुपात सुरु ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

बीड शहरात विद्युत समस्यांचे निराकरण करण्यासाठी जसे गंजलेले, वाकलेले विद्युत पोल बदलणे, लोंबणाऱ्या विद्युत तारा ओढून घेणे, कमी दाब वीज वाहिनी, उघडे रोहीत्र, ३३ के.व्ही., ११ के.व्ही. उच्चदाब वाहिन्या देखभाल व दुरुस्ती अशा विविध कामांसाठी १८ कंत्राटदारांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यापैकी १३ सुचिबद्ध कंत्राटदार हे वीज वाहिनीतील बिघाड दुरुस्तीसाठी माहे मे, २०२४ मध्ये नियुक्त करण्यात आले आहेत व ५ कंत्राटदार सुशिक्षीत बेरोजगार योजनेमध्ये प्रतिबंधात्मक देखभालीसाठी माहे मे, २०२५ मध्ये नेमण्यात आले आहेत. देखभाल दुरुस्तीची कामे नियमितपणे या कंत्राटदारांकडून करुन घेण्यात येतात. माहे मे, २०२५ मध्ये झालेल्या पूर्व मान्सुन वारे, वादळ व पावसामुळे बीड शहरात मोठया प्रमाणात वीज पुरवठा खंडीत झाला होता तो महावितरणचे कर्मचारी व सुचिबद्ध कंत्राटदार यांच्याकडून त्वरित पुर्ववत करण्यात आला आहे.

(३) हे अंशत: खरे आहे.

महापारेषण कंपनीच्या १३२/३३ के.व्ही. तेलगाव उपकेंद्राच्या परिसरात महावितरणचे ३३/११ के.व्ही. तेलगाव उपकेंद्र कार्यरत आहे. दि.१८.०४.२०२५ रोजी १६:३५ वा. तेथील ३३/११ के.व्ही. ५ एम. व्ही.ए. उच्चदाब रोहीत्र व उपकरणे जळाली. जळालेली सर्व उपकरणे, रोहीत्र, सी.टी., पी.टी., केबल बदलण्याची कामे त्वरीत सुरु करण्यात आले. दि.२२.०४.२०२५ रोजी या उपकेंद्रातील जळालेली सर्व उपकरणे बदलुन वीजपुरवठा या उपकेंद्राद्वारे पुन्हा कार्यरत करण्यात आला.

(४) या कालावधीमध्ये उपकेंद्र बंद असले तरीही तेलगाव उपकेंद्रांद्वारे वीज पुरवठा होणाऱ्या ग्राहकांचा वीज पुरवठा टप्प्याटप्याने पर्यायी व्यवस्थेमार्फत व इतर उपकेंद्रांद्वारे सुरळीत करण्यात आला होता.

प्रतिबंधात्मक कामे करुन घेण्यात निष्काळजीपणा केल्याबद्दल तत्कालीन उप कार्यकारी अभियंता, तेलगाव उपविभाग तसेच प्रधान यंत्रचालक, तेलगाव उपकेंद्र यांना दोषारोप पत्र देण्यात आले आहे व महावितरण कंपनीच्या नियमानुसार पुढील कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर व नागपूर जिल्ह्यात ऑनलाईन क्रिकेट सट्टा सुरु असल्याबाबत

**(८) * ११७४२ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घुग्घुस (जि.चंद्रपूर) येथे ऑनलाइन क्रिकेट सट्टा चालविल्याप्रकरणी पोलिसांनी छापा टाकून ४२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच दहेगाव-रंगारी (ता.सावनेर, जि.नागपूर) या गावात लाखो रुपयांचा क्रिकेट आयपीएल सट्टा लागत असल्याच्या तक्रारी ग्रामीण पोलीस ठाण्यात केल्या असता, पोलीसांनी सापळा रचून आरोपींसह लाखो रुपयांचे साहित्य जप्त केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त ठिकाणी सट्टेबाजीसाठी कोणते ऑनलाईन ॲप्स तथा अन्य साधने वापरण्यात आली आहेत तसेच किती जिल्ह्यातील अशी प्रकरणे निदर्शनास आली आहेत,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह अशा प्रकारच्या गुन्ह्यांना आळा बसविण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

घुग्घुस, ता.जि.चंद्रपूर येथे बेकायदेशिर ऑनलाईन प्लॅटफॉर्म तयार करून क्रिकेट सामन्यावर सट्टा स्विकारल्याने एका आरोपीविरूद्ध पोलीस स्टेशन, घुग्घुस येथे गु.र.क्र.५५/२०२५, महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ च्या कलम ४, ५ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असून, एकूण रू.४,००,०००/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(२) होय.

दहेगाव-रंगारी (ता.सावनेर, जि.नागपूर) येथे क्रिकेट सामन्यावर सट्टा लावल्याने पोलीस स्टेशन, खापरखेडा येथे गु.र.क्र.३४४/२०२५, महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम, १८८७ च्या कलम ४, ५ व भारतीय न्याय संहिता कलम ४९ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला असून, एकूण रू.१,२९,५६०/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरू आहे.

(३) व (४) घुग्घुस, ता.जि.चंद्रपूर येथील गुन्ह्यात kingexch.com याचा वापर झाला असल्याचे तपासात आढळून आले आहे. दहेगाव-रंगारी (ता.सावनेर, जि.नागपूर) येथील गुन्ह्यात क्रिकेट सट्टा करिता ऑनलाईन ॲप्सचा वापर करण्यात आला नसून, मोबाईल फोन्स व टि.व्ही. चा वापर करण्यात आला आहे.

राज्यात सन २०२३ ते सन २०२५ या कालावधीत चंद्रपूर-११, नागपूर ग्रामीण-११, अकोला-०१, अमरावती शहर-०२, नाशिक ग्रामीण-०१, नवी मुंबई-०१, धाराशिव-०१, पिंपरी-चिंचवड-०४, सोलापूर ग्रामीण-०१, वाशिम-०४, यवतमाळ-०९, मिरा-भाईंदर- ०३, पुणे शहर-०५, मुंबई शहर-३८ व ठाणे शहर-०५ असे एकूण ९७ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

ऑनलाईन जुगारास आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सायबर कार्यालयामार्फत समाज माध्यमांवरून तसेच प्रत्यक्षात सायबर जनजागृती कार्यक्रम राबवून जनजागृती करण्यात येते. सन २०१७-२०१९ या कालावधीत राज्यातील एकूण ३,२५३ पोलीस अधिकारी / कर्मचारी यांना सायबर गुन्ह्यांबाबत आधुनिक पद्धतीचे अन्वेषण आणि तपासाचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.

ऑनलाईन गेम बंद करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे विशेष कायदे अस्तित्वात नाहीत. तथापि, ऑनलाईन गेमवर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने केंद्र सरकारच्या इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत माहिती व तंत्रज्ञान कायद्यांतर्गत Information Technology (Intermediary Guidelines and Digital Media Ethics Code) Rules, २०२१, दिनांक ०६.०४.२०२३ रोजी भारतीय राजपत्रामध्ये प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत.

ऑनलाईन लॉटरी व ऑनलाईन गेम्स यांचे विनियमन करण्यासाठी कायदा करण्याबाबत राज्य शासनाच्या वतीने केंद्र शासनास विनंती करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यात प्लास्टिक बंदीचे उल्लंघन होत असल्याबाबत**

**(९) * १२०७० श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पर्यावरणास व आरोग्यास हानिकारक असणाऱ्या पन्नास मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्यांवर बंदी घालण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, भंडारा शहरात पन्नास मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक पिशव्या सर्रास वापरल्या जात असून जागोजागी प्लास्टिक पिशव्यांचा वापर खराब अन्न टाकण्यासाठी व भाजीपाल्यासाठी वापर होत असल्याने अन्नाच्या शोधात असणाऱ्या जनावरांचे प्लास्टिकच्या पिशव्यांतील अन्न खाल्ल्याने आरोग्य धोक्यात आल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन प्लास्टिक पिशव्यांवर बंदी आणण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

पशुसंवर्धन विभागामार्फत प्राप्त अहवालान्वये भंडारा शहरात भटक्या जनावरांकडून प्लास्टिकच्या पिशवीतील अन्न खाल्याने बाधित होऊन जनावरे आजारी पडल्याचे दिसून आलेले नाही असे कळविले आहे.

(३) नगर परिषद, भंडारा यांच्यामार्फत प्लास्टीक निर्मुलनासाठी उपद्रव शोध पथक तयार करुन शहरातील १३३ दुकानांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येऊन एकूण १०४५ किलो प्लास्टीक जप्त करण्यात आले आहे व दंडात्मक कार्यवाहीमध्ये रुपये ६३,०००/- इतका दंड आकारण्यात आला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालाड (पश्चिम) मुंबई येथील "माय क्वीन" आणि "जशन द बार" या डान्सबारमध्ये अनधिकृतरित्या मद्यविक्री व बारबालांचे नृत्य होत असल्याबाबत

**(१०) * १३१५१ श्री.संतोष बांगर (कळमनुरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालाड (पश्चिम) मुंबई येथील "माय क्वीन" आणि "जशन द बार" या डान्सबारमध्ये अनधिकृतरित्या मद्याची विक्री करण्यात येत असून अश्लीलपणे बारबाला नृत्य करीत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी स्थानिकांकडून मा.उपमुख्यमंत्री महोदय, आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क तसेच पोलीस उपायुक्त, परिमंडळ-१ यांचेकडे दिनांक २ जून, २०२५ रोजी तक्रार दाखल करुन सदर डान्सबारचे परवाने रद्द करण्याची मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) नाही.

सदर आस्थापनांना राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून एफ.एल.-III परवाने मंजुर करण्यात आले आहेत. सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे अश्लिल नृत्य होत असल्याचे पोलीसांमार्फत केलेल्या तपासणीत आढळून आले नाही.
(२) व (३) नाही.

विषयामध्ये नमूद आस्थापनांविरूद्ध दिनांकित तक्रार अर्ज प्राप्त झालेला नाही. तथापि, असा तक्रार अर्ज प्राप्त झाल्यास नियमोचित कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सकलेश्वर (बाराखांबी) (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील मंदिराच्या जतन व दुरुस्तीकरीता निधी मिळण्याबाबत

**(११) * ९१८६ श्रीमती नमिता मुंदडा (केज) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सकलेश्वर (बाराखांबी) (ता.अंबाजोगाई, जि.बीड) येथील मंदिर राज्यसंरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यासंदर्भातील प्राथमिक अधिसूचना काढण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी पुरातत्त्व विभागामार्फत करण्यात आलेल्या उत्खननादरम्यान इतर पाच मंदिरांचे अवशेष व जवळपास ११८ शिल्पावशेष व मृदभांडी, चुन्याच्या शिल्पांचे भग्न अवशेष, भाजलेल्या मातीच्या विटा व एक शिलालेख सापडले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सकलेश्वर मंदिराचे जतन, दुरुस्तीचे काम व प्राप्त झालेले मंदिर अवशेष यांची पुर्नउभारणी करण्यासाठी विभागीय निधीतून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सांस्कृतिक कार्य मंत्री महोदयांकडे दिनांक ९ एप्रिल, २०२५ रोजी केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन सकलेश्वर मंदिर जतन व दुरुस्ती करण्यासाठी शासनाने निधी उपलब्ध करुन देण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) होय.

सकलेश्वर (बाराखांबी) मंदिर, अंबाजोगाई ता.अंबाजोगाई, जि.बीड हे स्मारक राज्य संरिक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याबाबतचा प्राथमिक अधिसूचनेचा प्रस्ताव शासन निर्णय क्र.रासंस्मा-२०२३/प्र.क्र.१५९/सां.का.३, दि.०७.०४.२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आला आहे. अंतिम अधिसूचना प्रस्तावाची प्रक्रिया सुरु आहे.

(२) होय.

संचालनालयाकडून सदरील उत्खनन कामाकरिता २०१७-१८ मध्ये रुपये ४,००,०००/- इतक्या रक्कमेस मंजूरी देण्यात आली होती. त्यानुसार छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालयाकडून सकलेश्वर मंदिर परिसरात उत्खनन काम हाती घेण्यात येऊन पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण करण्यात आले होते. विभागामार्फत २०१८ साली करण्यात आलेल्या उत्खननादरम्यान आणखी ३ मंदिरांचे अवशेष व जवळपास ११८ शिल्पांचे अवशेष प्राप्त झाले होते. तसेच मृदभांडी, चुन्याच्या शिल्पांचे भग्न अवशेष, भाजलेल्या मातीच्या विटा व एका शिलालेखाचे भग्न अवशेष प्राप्त झाले आहेत.

(३) होय.

श्रीमती नमिता अक्षय मुंदडा, मा.वि.स.स. केज, बीड यांनी सकलेश्वर (बाराखांबी) मंदिर या राज्य संरक्षित स्मारकाच्या संवर्धन व संरक्षणासाठीचे निधी मिळण्याबाबतचे निवेदन प्राप्त आहे.

(४) सदर स्मारकाचे काम अंतिम टप्प्याच्या उत्खननासाठी सन २०२५-२६ आर्थिक वर्षामध्ये अद्याप पर्यंत रू.३४,७३,१०८ इतका निधी खर्ची पडला आहे. निधी उपलब्धतेनुसार त्या-त्या स्मारकाचे जतन व दुरूस्तीची कामे केली जातात.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आन्वा (ता.भोकरदन, जि.जालना) येथील गावठाण वीज लाईनचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याबाबत

**(१२) * १२२९६ श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आन्वा (ता.भोकरदन, जि.जालना) येथील ३३ के.व्ही. च्या उपकेंद्रातून आन्वा, जळगाव सपकाळ, वाकडी असे ३ फीडर स्थापित केल्यानंतर त्यावर ४५ रोहित्रे बसविण्याकरीता सुमारे दिड कोटी रुपये खर्च करुन वीज लाईन प्रकल्पाचे काम माहे मार्च, २०२५ मध्ये करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाच्या कामात ठेकेदार व संबंधित अधिकारी यांनी अतिशय निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरल्याने पहिल्याच पावसात डीपी, रोहित्रे तसेच विजेचे खांब यांची दुरवस्था झाल्याने त्यावर लावलेले इन्सुलेटर फुटून वीज पुरवठा वारंवार खंडीत होऊन त्याचा नाहक त्रास १७ गावातील ६ हजार वीज ग्राहकांना सोसावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधित अधिकारी व ठेकेदारांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

आन्वा ता. भोकरदन, जि.जालना येथील ३३ के.व्ही.च्या उपकेंद्रातून आन्वा, जळगाव सपकाळ, वाकडी असे तीन फिडर स्थापित केल्यानंतर त्यावर ३७ रोहित्रे बसविण्याकरिता व इतर संलग्न कामाकरिता सुमारे ४ कोटी ६७ लाख रुपये खर्च केला आहे. ११ के.व्ही. जळगाव सपकाळ, वाकडी या दोन फिडरचे काम माहे मार्च, २०२५ पूर्वी करण्यात आले आहे व ११ के. व्ही. अन्वा फिडरचे काम माहे जून, २०२५ मध्ये पूर्ण करण्यात आले आहे.
(२) हे खरे नाही.

सद्य:स्थितीत ११ के.व्ही. आन्वा उपकेंद्रावरील सर्व गावांचा वीज पुरवठा हा सुरळीत चालू आहे. संबंधित उपकेंद्रातील फिडर इंटरप्शनची माहिती घेतली असता, ११ के.व्ही. वाकडी गावठाण फिडर हे फक्त तीन वेळा ब्रेक डाऊन झाले आहे. त्याचे कारण अर्थ फॉल्ट असून, अद्याप पर्यंत फिडर वरील कोणतेही इन्सुलेटर बदलण्यात आलेले नाही. त्यामुळे वीज पुरवठा खंडित होण्याची कारणे इन्सुलेटर फुटण्याचे नसून अन्य तांत्रिक बाब आहे. सद्य:स्थितीत सर्व संबंधित फिडरचा वीज पुरवठा सुरळीत चालू आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील अंमली पदार्थांची तस्करी रोखण्यासह अंमली पदार्थाच्या विक्रीवर प्रतिबंध आणण्याबाबत

**(१३) * ७१२३ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.निलेश राणे (कुडाळ), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर), श्री.सत्यजित देशमुख (शिराळा), श्री.संजय देरकर (वणी), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), डॉ.तुषार राठोड (मुखेड), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.अनिल पाटील (अमळनेर), श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य), श्री.उमेश ऊर्फ चंदु यावलकर (मोर्शी), श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.सुहास बाबर**

**(खानापूर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर), श्री.राहुल आवाडे (इचलकरंजी), श्री.राजेंद्र गावित (पालघर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: मुंबई, ठाणे, नवी मुंबई, यवतमाळ, उस्मानाबाद, नाशिक, पालघर, पुणे, सांगली, नांदेड, लातूर, जालना, अमरावती, नागपूर, चंद्रपूर व कोकणातील जिल्हयांमध्ये माहे मार्च-एप्रिल, २०२५ मध्ये पोलिसांनी मोठया प्रमाणात अंमली पदार्थ जप्त केले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उल्हासनगर शहरात ऑनलाईन लॉटरी, पानटपरी वर खुलेआम गुटखा विकणे, ऑनलाईन मटका जुगार खेळणे, हुक्का पार्लर, क्रिकेट सट्टा तसेच गांजा चरस या सारखे अंमली पदार्थ विकणे, असे मोठ्या प्रमाणावर अनधिकृत व्यवसाय सुरू असून त्यावर कारवाई करावी अशी मागणी लोकप्रतिनिधी यांनी मा.मुख्यमंत्री, पोलिस महासंचालक, ठाणे पोलिस आयुक्त यांच्याकडे दिनांक २३ डिसेंबर, २०२४ रोजी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ तसेच इतर अंमली पदार्थांवर बंदी असताना अनेक पानटपऱ्या व स्टॉलवर गुटखा व तंबाखूजन्य तसेच अंमली पदार्थांची सर्रासपणे विक्री होत असल्याने तरुण मोठ्या प्रमाणात नशेच्या आहारी जात असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, संबंधित विभागातील अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे व नियोजन शून्य कारभारामुळे ठोस कारवाई होत नसल्यामुळे परराज्यातून सर्रासपणे गुटखा, एम.डी.ड्रग्ज, मेफेड्रोन व तंबाखूजन्य पदार्थांची तस्करी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीच्या अनुषंगाने अंमली पदार्थ विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यासह परराज्यातून गुटखा व अन्य पदार्थांची तस्करी रोखून अंमली पदार्थाच्या विक्रीवर प्रतिबंध आणण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) राज्यात अंमली पदार्थाची तस्करी करणाऱ्यांविरुध्द / जवळ बाळगणाऱ्यांविरुध्द / सेवनार्थीं विरुध्द एनडीपीएस कायदा १९८५ अन्वये कारवाई करण्यात येते. राज्यात जानेवारी ते एप्रिल, २०२५ पर्यंत अंमली पदार्थ कायद्यांतर्गत ५००१ गुन्हे दाखल असून ४४८१ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. तसेच एकूण रू.१५३.२५ कोटी किंमतीचे २८३०२ किलो वजनाचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले आहेत.

(२) उल्हासनगर शहरातील अंमली पदार्थ विकणा-या आणि सेवन करणा-यांवर तातडीने कार्यवाही होण्याबाबत मा.लोकप्रतिनिधी यांनी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई व पोलीस आयुक्त ठाणे शहर यांच्याकडे निवेदन सादर केले आहे.

सन २०२५ मध्ये परिमंडळ-४, उल्हासनगर मधील पोलीस ठाणे हद्दीत अवैध व्यवसायाच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईची सांख्यिकी माहिती खालील प्रमाणे आहे.

| | दाखल गुन्हे | अटक आरोपी | किंमत |
|---|---|---|---|
| अंमली पदार्थ | १७२ | १८३ | ७७,६०,५६९ |
| गुटखा | १ | १ | ४,३२० |
| मटका/जुगार | १२३ | ३२६ | ६,६०,१३९ |
| हुक्का पार्लर | १ | ११ | ९,९४० |
| ऑनलाईन लॉटरी | ० | ० | ० |

(३) व (४) राज्यात प्रतिबंधीत गुटखा व तंबाखूजन्य पदार्थ तसेच इतर अंमली पदार्थावर बंदी असतानाही अनेक पानटप-या व स्टॉलवर होत असलेल्या विक्रीच्या अनुषंगाने पोलीस विभागाद्वारे सिगारेट व तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात, प्रतिबंध व व्यापार वाणिज्य, उत्पादन, पुरवठा व वितरण यांचे विनियमन) कायदा २००३ च्या कलम ४, ५, ६अ, ६ब व ७ अन्वये राज्यात जानेवारी ते एप्रिल २०२५ या कालावधीत ३७,१४९ व्यक्तींवर कारवाई करण्यात आली असून त्यामध्ये एकुण रु.४४,४०,७५३/- इतक्या किंमतीचा दंड वसूल करण्यात आला आहे.
(५) पोलीस महासंचालक कार्यालयाच्या दि.६.१०.२०१० च्या परिपत्रकान्वये संपूर्ण महाराष्ट्रात अवैध दारु विक्री निर्मिती/गुटखा बंदी बाबत आवश्यक ती प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने तसेच
दि.३.१२.२०२१ च्या परिपत्रकान्वये गुटखा, पानमसाला, सुगंधित तंबाखू/सुगंधित सुपारी, खरा, मावा या प्रतिबंधीत अन्न पदार्थांच्या बंदीची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने व दि.३१.०३.२०२२ च्या परिपत्रकान्वये विदेशी सिगारेट व तंबाखुच्या पाकीटांवर सचित्र वैधानिक इशारा नसलेल्या बेकायदेशीर उत्पादनांच्या विक्रीवर/ तस्करीवर कारवाई करण्याबाबत सर्व पोलीस घटक प्रमुखांना आवश्यक त्या सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.
अंमली पदार्थ तस्करी तसेच विक्रीवर आळा घालण्यासाठी शासन खालील प्रमाणे उपययोजना करते.

- राज्यात अंमली पदार्थाच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी सर्व पोलीस घटकामध्ये स्वतंत्र अंमली पदार्थ विरोधी कक्ष स्थापन केलेले आहेत.
- केंद्र शासनाच्या दि २५.०३.२०२२ च्या आदेशान्वये नार्कोकोऑर्डीनेशन यंत्रणेची पुनर्रचना करण्यात आली असून त्यानुसार दि.३१.०८.२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली आहे. शासन निर्णय दि.०६.०८.२०२४ अन्वये अंमली पदार्थ टास्क फोर्स, महाराष्ट्र राज्य, पुणे यांची राज्यासाठी NCORD (Narco-Coordination centre) सचिवालय म्हणून व विशेष पोलीस महानिरिक्षक, अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) यांची राज्यस्तरीय नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स करीता दि.१९.०३.२०२५ रोजीच्या शासन निर्णय क्र एपीओ-३१२३ /प्र.क्र.८२ / पोल-३ अन्वये एकूण ३४६ पदे नव्याने निर्माण करण्यात आली आहेत.
- दरवर्षी २६ जून रोजी जागतिक अंमली पदार्थ विरोधी दिन साजरा केला जातो. या वर्षी दि १२ जून, २०२५ ते २६ जून, २०२५ या कालावधी दरम्यान राज्यात अंमली पदार्थ विरोधी पंधरवडा अभियान राबविण्यात येत आहे सदर कालावधीत अंमली पदार्थ विरोधी कक्ष, स्थानिक पोलीस ठाणे तसेच अशासकीय संस्था मार्फत त्यांच्या कार्यक्षेत्रातील शाळा, महाविद्ध्यालय, रेल्वे स्थानक, महत्वाचे चौकांमध्ये अंमली पदार्थ विरोधी पोस्टर्स, बॅनर्स तसेच पथनाट्याद्वारे जनजागृती केली जाते.

-----------------

## राज्यात ई-सिगारेटच्या विक्रीवर बंदी आणण्याबाबत

**(१४) * १२८५८ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य शासनाने सन २०१९ मध्ये ई-सिगारेटची विक्री, साठवणूक आणि जाहिरातीवर बंदी घातली असताना सुद्धा राज्यात मोठया प्रमाणात ठिकठिकाणी ई-सिगारेटची विक्री होत असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई-सिगारेटची विक्री व जाहिरातींमुळे मोठ्या प्रमाणात विशेषत: विद्यार्थी, युवती व युवकांमध्ये व्यसनांचे प्रमाण वाढून त्यांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणांकडे संबंधित अधिकाऱ्यांचे योग्य नियोजनाअभावी दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून ई-सिगारेटच्या विक्रीला आळा बसविण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यात विना धूर ई-सिगारेटबाबत “इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट प्रतिबंध (उत्पादन, निर्मिती, आयात,निर्यात, वाहतुक, विक्री, वितरण, साठा आणि जाहिरात) अधिनियम, २०१९” या कायद्यानुसार कारवाई करण्यात येते. सदर कायद्यांतर्गत राज्यात माहे मे, २०२५ मध्ये मुंबई शहर, नागपूर शहर, पिंपरी-चिंचवड व ठाणे शहर या पोलीस आयुक्तालयांतर्गत एकूण ११ गुन्हे दाखल असून रुपये १५.४७ लक्ष इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(२), (३) व (४) उक्त अधिनियमातील कलम ४ व ५ मधील तरतूदीनुसार ई-सिगारेटच्या उत्पादन, आयात, निर्यात, वाहतूक, विक्री, वितरण, साठवणूक व जाहिरातीवर बंदी घालण्यात आली आहे.

ई-सिगारेटला आळा बसविण्याकरीता विविध कार्यक्रमांचे तसेच पथनाट्यांचे आयोजन करण्यात येऊन त्याद्वारे ई-सिगारेटमुळे आरोग्यास होणाऱ्या नुकसानीबाबत राज्यातील नागरीकांमध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच, शाळा व महाविद्यालयात प्रत्यक्ष भेटी देऊन पोलीस दिदी, पोलीस अधिकारी यांच्यामार्फत ई-सिगारेट व्यसनांपासून होणाऱ्या दुष्परिणामांबाबत विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते.

मोहल्ला कमिटी, पोलीस मित्र, आईज ॲण्ड इअर यांच्या सभासदांसमवेत पोलीस ठाणे स्तरावर वेळोवेळी याबाबत बैठका आयोजित करण्यात येतात.

सदर कायद्यांतर्गत राज्यात सन २०२१ ते २०२५ (मे अखेरपर्यंत) या कालावधीत एकूण २४७ गुन्हे दाखल असून सुमारे ४ कोटी ३३ लक्ष इतक्या किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच भविष्यात राज्यातील विविध पोलीस घटकांतर्गत विविध पोलीस ठाणे हद्दीत ई-सिगारेट विक्री करताना/ जवळ बाळगताना मिळून आल्यास “इलेक्ट्रॉनिक्स सिगारेट प्रतिबंध (उत्पादन, निर्मिती, आयात, निर्यात, वाहतुक, विक्री, वितरण, साठा आणि जाहिरात) अधिनियम, २०१९” अन्वये कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डोंबिवली (जि.ठाणे) येथे नेटवर्थ मार्केटिंग लिमिटेडचे संचालक यांनी दुप्पट रक्कम मिळवून देण्याच्या नावाने अनेक नागरिकांची फसवणूक केल्याबाबत

**(१५) * ९७८२ श्री.महेश सावंत (माहिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोंबिवली (जि.ठाणे) येथे नेटवर्थ मार्केटिंग लिमिटेडचे संचालक, श्री.अनिस काझी यांनी इतर बोगस फायनान्स कंपनींद्वारे दुप्पट रक्कम मिळवून देण्याच्या नावाने अनेक नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचे माहे ऑगस्ट, २०१९ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी अनेक नागरिकांची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याचा मानसिक ताण येऊन काही नागरिकांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी श्री.काझी यांच्याविरुध्द विष्णु नगर पोलीस स्टेशन, डोंबिवली, जिल्हा ठाणे येथे तक्रार नोंदविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध व कंपनीवर शासनाने कारवाई करुन फसवणूक केलेल्या नागरिकांची रक्कम परत मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सेबीकडून प्राप्त माहितीनुसार नेटवर्थ मार्केटिंग लिमिटेडचे संचालक श्री.अनिस काझी व इतर यांनी त्यांच्याकडील विविध योजनांमध्ये रक्कम गुंतविल्यास जास्त व्याजदराने परतावा देण्याचे आमिष दाखवून गुंतवणूकदारांकडून गुंतवणूक स्विकारल्याबाबतच्या तक्रारी सेबीकडे प्राप्त झाल्या आहेत.
(२) सदर प्रकरणी गुन्हा नोंद नसल्याने याबाबतची माहिती उपलब्ध नाही.
(३) हे खरे नाही.

सदर प्रकरणी श्री. काझी यांच्याविरुद्ध विष्णु नगर पोलीस स्टेशन, डोंबिवली, जिल्हा ठाणे येथे तक्रार नोंदविण्यात आलेली नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## रायगड जिल्ह्यातील औद्योगिक क्षेत्रातील रसायनिक कंपन्यांतून होणारे जल प्रदूषण रोखण्याबाबत

**(१६) * १०६०६ श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.महेश बालदी (उरण), श्री.राजु तोडसाम (अर्णी), श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रायगड जिल्ह्यातील अलिबाग, पेण, महाड, रोहा, पाताळगंगा, माणगांव तसेच पनवेल परिसरातील औद्योगिक क्षेत्रात अडीच हजारांहून अधिक रसायनिक कंपन्यांचे दुषित पाणी नदी–नाल्यात सोडले जात असल्यामुळे तेथील नद्या व खाडया मोठ्या प्रमाणावर प्रदूषित झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रदूषणाबाबत स्थानिक नागरिकांनी व मच्छीमारांनी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे वारंवार तक्रारी दाखल करूनही अद्याप दोषी कंपन्यांवर कारवाई करण्यात आली नसल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर नद्या व खाडी प्रदूषणमुक्त करण्याबाबत तसेच दोषी कंपन्या व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

तथापि, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडून कोणत्याही उद्योगास विनाप्रक्रिया सांडपाणी सोडण्यास परवानगी देण्यात येत नाही.

(२) व (३) हे खरे नाही.

प्रश्नाधीन औद्योगिक क्षेत्रामध्ये होत असलेल्या प्रदूषणाच्या अनुषंगाने माहे मार्च, २०२४ ते जून, २०२५ या कालावधीमध्ये प्राप्त विविध तक्रारी व त्रूटींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत एकूण ९८ उद्योगांना प्रस्तावित आदेश, ५७ उद्योगांना अंतरिम आदेश व १५ उद्योगांना बंदचे आदेश देण्यात आले आहेत.

रायगड जिल्हातील औद्योगिक परिसरातील प्रदुषणाबाबत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत उद्योगांना वेळोवेळी भेट देऊन पाहणी करण्यात येते व पाहणी दरम्यान दोषी आढळून आलेल्या व संमतीपत्रातील अटी व शर्तीचे उल्लंघन करत असल्यास सदर उद्योगांवर नियमांनुसार वेळोवेळी आवश्यक ती कारवाई करण्यात येते.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील गोवंडी येथील शिवाजीनगर पोलिस स्थानकांत कार्यरत असलेल्या वरिष्ठ पोलिस निरिक्षकाने केलेला गैरव्यवहार

**(१७) * ९६६१ श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील गोवंडी येथील शिवाजीनगर पोलिस स्थानकांत कार्यरत असलेल्या वरिष्ठ पोलिस निरिक्षकाला एका शैक्षणिक संस्थेकडून १ लाख रुपयांची लाच घेतांना दिनांक १३ मे, २०२५ रोजी अटक करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे.

(३) आरोपी लोकसेवक तत्कालीन वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजी नगर पोलीस ठाणे, मुंबई यांनी फिर्यादी यांना मदत करण्यासाठी तसेच धर्मादाय आयुक्त, बृहन्मुंबई यांचे अंतिम आदेश येईपर्यंत फिर्यादी यांचे ट्रस्टच्या शाळेच्या परिसरात विरोधकांना प्रवेश करू न देण्यासाठी आणि पोलीस संरक्षण देण्यासाठी फिर्यादी यांचेकडे ३ लाख रूपयांची लाचेची मागणी केली होती. त्यांनी तडजोडी अंती रू.२,५०,०००/- स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने, सापळा कारवाईमध्ये फिर्यादी यांचेकडुन लाचेच्या रकमेचा पहिला हफ्ता म्हणून रूपये १ लाख इतकी रक्कम स्विकारताना लोकसेवक आरोपीस रंगेहाथ पकडण्यात येऊन, त्यांचेविरूद्ध ला.प्र.वि. मुंबई विभाग येथे दिनांक १३.०५.२०२५ रोजी गु.र.क्र. १८/२०२५, कलम ७ भ्र.प्र.अधि. १९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोकसेवक आरोपीस सदर गुन्हयात अटक करण्यात आली असून गुन्हाचा तपास सुरू आहे. आरोपीस अटकेच्या म्हणजेच दि.१३.०५.२०२५ पासून शासन सेवेतून निलंबीत केले आहे. आ.लो.से. यांच्या विरुद्ध मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) नियम, १९५६ च्या नियम ३ अन्वये विभागीय चौकशी करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हा कारागृहातील अंतर्गत बांधकामात झालेली अनियमितता

**(१८) * १२३४२ श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील जिल्हा कारागृहात तत्कालीन अधीक्षक श्री.किर्ती चिंतामणी यांच्या कारर्किदीत कोट्यवधी रुपयांच्या केलेल्या विविध कामात अनियमितता झाली असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शानास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी श्री.चिंतामणी यांनी सन २०१८-१९ व २०१९-२० या दरम्यान जिल्हा कारागृहातील सुरक्षेच्या व अन्य दृष्टीकोनातून अंतर्गत रस्त्याचे काम निर्मिती, कारागृह सुरक्षेच्या दृष्टीने वॉचटॉवर तसेच सुरक्षा आवार भिंतीची उंची वाढविणे इत्यादी कामांसाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करुन त्याबाबतची निविदा प्रक्रिया देखील पूर्ण केली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी कामांची पाहणी केली असता, नवीन कामांची मंजूरी घेतली असताना देखील जुन्याच कामांना रंगरंगोटी करुन वॉचटॉवरचे काम देखील अपुर्णावस्थेत ठेवल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) यवतमाळ जिल्हा कारागृहास जिल्हा नियोजन समिती, यवतमाळ यांचेकडून सन २०१८-१९ या कालावधीमध्ये निधी प्राप्त झाला नसून सन २०१९-२० या कालावधीमध्ये रु.१२.४९ कोटी इतक्या रकमेस खालील कामांकरीता प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली.

कारागृह परिसरातील i) पूर्वेकडील अधिकारी / कर्मचारी निवासस्थान विस्तारीकरण व अनुषंगिक बाबींची कामे (रु.२.५० कोटी), ii) दक्षिणेकडील अधिकारी/ कर्मचारी निवासस्थानांचे विस्तारीकरण व अनुषंगिक बाबींची कामे (रु.२.५० कोटी), iii) कारागृह परिसरातील कर्मचारी निवासस्थान विस्तारीकरण व अनुषंगिक बाबींची कामे (रु.२.५० कोटी), iv) हॉलचे बांधकाम व सुधारणा (रु.२.४९ कोटी) तसेच v) आवार भिंत व कॉँक्रीट रस्त्याचे बांधकाम (रु.२.५० कोटी).

उक्त कामांकरीता रु.१२.२४ कोटी इतका निधी सन २०२०-२१ ते २०२२-२३ या कालावधीत टप्प्याटप्प्याने प्राप्त झाला आहे. सदर कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात आली आहेत.

शासनाच्या प्रचलित धोरण / नियमानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देऊन व दिनांक ०८/१२/२०२० रोजी ई-निविदा प्रक्रिया राबवून अंतर्गत रस्त्याचे (कॉँक्रीट रस्ता) आणि आवार भिंतीचे बांधकाम पूर्ण करण्यात आले आहे. तसेच कारागृहाच्या सुरक्षेच्या दृष्टीने भिंतीची उंची वाढविणे शक्य नसल्याने त्याऐवजी जास्त उंचीचे तार फेन्सिंगचे काम करण्यात आले आहे.

सदर कालावधीत वॉच टॉवरचे बांधकाम करण्याची बाब कारागृह स्तरावर प्रस्तावित होती. मात्र सदर कामांमध्ये वॉचटॉवरच्या कामास प्रशासकीय मान्यता नसल्यामुळे सदर काम करण्यात आले नाही.

(३) ही बाब खरी नाही.

कारागृहाच्या अस्तित्वातील भिंतींना नव्याने रंगरंगोटी करण्यात आली आहे. तसेच प्रशासकीय मान्यताप्राप्त नवीन ५८ अधिकारी/कर्मचारी यांच्या निवासस्थानांचे बांधकाम करण्यात आले असून त्यांना देखील रंगरंगोटी करण्यात आली आहे. प्रशासकीय मान्यतेमध्ये वॉचटॉवरच्या कामाचा समावेश नसल्याने सदर काम करण्यात आलेले नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील मे.कार इंम्पाअर्स गॅरेज मालकाकडून अनधिकृतपणे व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(१९)** * **८३०८ श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील जोगेश्वरी (पूर्व) येथील एस.व्ही.रोडवरील मे.कार इंम्पाअर्स गॅरेज मालकाकडून अनधिकृतपणे व्यवसाय सुरु असून रस्त्याच्या दुतर्फा अनेक वाहने उभी असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे दुर्गानगर जंक्शन ते मॉर्डन टाऊन सोसायटी येथील स्थानिक रहिवाश्यांना तसेच शाळकरी विदयार्थ्यांना दैनंदिन रहदारीस व वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी करुन अनधिकृतपणे व्यवसाय सुरु असल्यामुळे स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १८ एप्रिल, २०२५ रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ पोलिस ठाणे, अंधेरी (पूर्व), मुंबई यांच्याकडे पत्रव्यवहार करुनही अद्यापपर्यंत कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अनधिकृत उभी केलेली वाहने हटविण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

मुंबई जोगेश्वरी पूर्व विधानसभा क्षेत्रातील एस.व्ही. रोड नसुन सदर गॅरेज हे वल्लभभाई पटेल रोडवर असून या गॅरेजला बृहन्मुंबई महानगरपालिका यांनी एमआरटीपी कायदया अंतर्गत कलम ५५ अन्वये नोटीस बजावली आहे. या नोटीशी विरुध्द मे.कार इंम्पाअर्स गॅरेज मालकाने शहर व दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला आहे. सध्या न्यायालयात प्रकरण न्याय प्रविष्ठ आहे.

सदर रस्त्याच्या दुतर्फा अनेक वाहने उभी केलेली असतात असे निदर्शनास आले आहे. सदर ठिकाणी सन २०२५ मध्ये अद्यापपर्यंत १३१ वाहनांवर मोटार वाहन कायदा १९८८ कलम १२२ प्रमाणे ई-चलान कारवाई करण्यात आलेली आहे.

(२), (३) व (४) दुर्गानगर जक्शन ते मॉर्डन टाऊन सोसायटी येथील रस्त्यावर सदर गॅरेजची वाहने रस्त्याच्या दुतर्फा उभी असल्याने स्थानिक रहिवाशांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना दैनंदिन रहदारीस व वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याबाबतची तक्रार लोकप्रतिनिधी कडून एप्रिल, २०२५ मध्ये एम.आय.डी.सी. वाहतुक विभागास प्राप्त झालेली आहे.

सदर पत्राच्या अनुषंगाने एमआयडीसी वाहतुक विभागातर्फे एकुण ५५ वाहनांवर मोटार वाहन कायदा १९८८ कलम १२२/१७७ अन्वये कारवाई करण्यात आलेली आहे. याबाबत महानगरपालिका के/पूर्व विभागाशी वाहतूक पोलीस स्तरावर उक्त प्रकरणी पत्र व्यवहार केलेला आहे. तसेच सदर ठिकाणी वाहतूक सुरळीतपणे राहण्यासाठी नियमित कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शेटफळ (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील शिवारात विद्युत तारेच्या धक्क्याने व्यक्तीचा झालेला मृत्यू

**(२०) * १३०२६ श्री.अभिजीत पाटील (माढा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शेटफळ (ता.मोहोळ, जि.सोलापूर) येथील शिवारात महावितरणच्या ट्रान्सफॉर्मजवळ शेतात पडलेल्या विद्युत तारेच्या धक्क्याने एका व्यक्तीचा मृत्यू तर दोघेजण जखमी झाल्याची घटना दिनांक १७ एप्रिल, २०२५ रोजी घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी दुरध्वनीव्दारे महावितरणला कळवूनही महावितरणकडून कोणतीच मदत करण्यात न आल्याने महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांविरोधात मोहोळ पोलीसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्याच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह शेतात मृत्यू पावलेल्या शेतकऱ्याच्या कुटुंबियांना व जखमींना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येतआहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर घटनेची लेखी फिर्याद तत्कालीन सहाय्यक अभियंता श्री.पुरूषोत्तम ढेरे, महावितरण, शाखा कार्यालय, शेटफळ यांनी दिनांक १६.०४.२०२५ रोजी पोलीस ठाणे, मोहोळ येथे दिली. तत्पुर्वीच महावितरणचे तत्कालीन कार्यकारी अभियंता, श्री.राठोड, उपकार्यकारी अभियंता, श्री.कलशेट्टी व सहाय्यक अभियंता, श्री.ढेरे यांच्यावर मोहोळ पोलीस ठाणे येथे दि.१५.०४.२०२५ रोजी गुन्हा दाखल झाला आहे.

(३) सदर प्राणांतिक अपघाताची चौकशी विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १६१ नुसार मुख्य विद्युत निरिक्षक, मुंबई यांच्यामार्फत करण्यात आली आहे. त्यानुसार, दि.२६.०६.२०२५ रोजीच्या अहवालान्वये अपघाताची जबाबदारी महावितरण कंपनीवर निश्चित करण्यात आली. त्याअनुषंगाने, कंपनीच्या प्रचलित नियमाप्रमाणे कायदेशीर वारसदार मयताच्या पत्नी श्रीमती प्रभादेवी महादेव देसाई यांना नुकसान भरपाई म्हणून रक्कम रु. ४.०० लाख महावितरणकडून दि.२७.०६.२०२५ रोजी देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडाळाच्या बसेसच्या झालेल्या दूरवस्थेमुळे नागरिकांची होत असलेली गैरसोय

**(२१) * ७१०६ श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.रमेश कराड (लातूर ग्रामीण), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.देवेंद्र कोठे (सोलापूर शहर मध्य), श्री.विक्रम पाचपुते (श्रीगोंदा), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्रीमती देवयानी फरांदे (नाशिक मध्य), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.अभिमन्यु पवार (औसा), श्री.अमोल पाटील (एरंडोल), श्री.शंकर मांडेकर (भोर), श्री.संजय उपाध्याय (बोरीवली), श्री.रत्नाकर गुट्टे (गंगाखेड), श्री.गजानन लवटे (दर्यापूर), श्री.शिवाजी पाटील (चंदगड), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.अमोल खताळ (संगमनेर), डॉ.नितिन राऊत (नागपूर उत्तर), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विकास ठाकरे**

**(नागपूर पश्चिम), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.करण देवतळे (वरोरा), श्री.प्रताप अडसड (धामणगाव रेल्वे), श्री.प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके (माजलगांव), डॉ.तुषार राठोड (मुखेड), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.आमश्या पाडवी (अक्कलकुवा), श्री.शेखर निकम (चिपळूण), श्री.राम कदम (घाटकोपर पश्चिम), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मोनिका राजळे (शेवगांव), श्री.विजय देशमुख (सोलापूर शहर उत्तर), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर), श्री.चरणसिंग ठाकूर (काटोल), डॉ.मिलिंद नरोटे (गडचिरोली), श्री.संग्राम जगताप (अहिल्यानगर शहर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विशेषत: अहिल्यानगर, नागपूर, सांगली, परभणी, सोलापूर, मुंबई, ठाणे, बीड, जळगांव, पुणे, नांदेड, भंडारा, अमरावती, नंदुरबार, रत्नागिरी, जालना, चंद्रपूर, गडचिरोली, अहमदनगर, इत्यादी जिल्ह्यामध्ये तसेच चिपळूण येथील महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडाळाच्या बसेसच्या झालेल्या दूरवस्थेमुळे नागरिकांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेस आवश्यक क्षमतेपेक्षा कमी उपलब्ध असणे, बसेसची दुरवस्था झालेली असणे तसेच कालबाह्य झालेल्या नादुरुस्त बसेस यामुळे अपघातांचे वाढते प्रमाण, बसेसच्या कमतरतेमुळे दैनंदिन फेऱ्या कमी होणे, गाड्यांच्या देखभाली व दुरुस्तीकरीता स्थायी व्यवस्था असतानाही ती योग्यतऱ्हेने कार्यान्वित नसणे तसेच एस.टी. आगारांची दुरवस्था होणे इत्यादी अनेक कारणांमुळे प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व बसस्थानक व आगारांचे तातडीने सुरक्षा लेखापरीक्षण करुन नादुरुस्त व जप्त केलेल्या, सर्वाधिक आयुर्मान पूर्ण झालेल्या भंगार बस गाड्या निष्कासित करण्यात याव्यात अशा सूचना मा.परिवहन मंत्री महोदयांनी माहे एप्रिल, २०२५ मध्ये दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यातील दुर्गम भागांमध्ये व गड किल्ल्यांच्या ठिकाणी पर्यटन वाढीच्या दृष्टीने मिनी बस सेवा सुरू होण्याबाबत तसेच विशेष ग्रामीण सेवा, मिनी बस अथवा साप्ताहिक फेऱ्या सुरू करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.उपमुख्यमंत्री यांना माहे जानेवारी, २०२५ मध्ये लेखी निवदेन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, एस.टी.बसेस बाबत वारंवार नागरिक व लोकप्रतिनिधी यांचेकडून शासनाकडे निवेदन वा तक्रार करुनही नवीन बस खरेदी व बस स्थानकामध्ये सुधारणा करण्याबाबत कोणतीही प्रभावी उपाययोजना व त्याची अंमलबजावणी करण्यात येत नाही, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

(३) होय.

(४) मा. मंत्री परिवहन तथा अध्यक्ष रा. प. महामंडळ यांना निवेदने दिलेली आहेत.

(५) व (६) बसेसची कमतरता भरुन काढण्यासाठी रा.प. महामंडळाच्या स्वमालकीच्या २६४० बसेस घेण्यात आल्या आहेत. आजअखेर यातील १७२७ बसेस प्राप्त झाल्या आहेत. तसेच स्वमालकीच्या ३००० नवीन साध्या बसेस घेण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. रा.प. बसस्थानकामध्ये सुधारणा करण्याबाबत शासन निधी तसेच सार्वजनिक खाजगी सहभाग (पीपीपी) तत्वावर विकसनाचे नियोजन आहे.

-----------------

**सुरजागड (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) येथे मोठ्या प्रमाणात लोह खनिज वाहतूक होत असल्याबाबत**

**(२२) * ११०२७ श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सुरजागड (ता.एटापल्ली, जि.गडचिरोली) येथे मोठ्या प्रमाणात लोह खनिज वाहतूक होत असल्यामुळे वाहतूक कोंडी, धुळ प्रदूषण व अपघाताच्या घटनांत वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी झालेल्या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत व रोजगाराची तरतूद करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन खनिज वाहतुकीसाठी स्वतंत्र बायपास रस्ता किंवा वाहतूक मार्ग तयार करण्याबाबत व इंदिरा गांधी चौक आणि शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक नियमनासाठी सिग्नल यंत्रणा, सीसीटीव्ही कॅमेरे व ट्रक वाहतुकीवर वेळोवेळी निर्बंध लागू करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) व (२) होय.

(३) अपघात कमी करण्याच्या दृष्टीने, कोळसा, राख, विटा, वाळू, गौण खनिज ताडपत्री न झाकता वाहतूक करणाऱ्या वाहनास, पहिला गुन्हा असल्यास ५ दिवस परवाना निलंबन किंवा रु.५,०००/- दंड, दुसरा गुन्हा असल्यास १० दिवस परवाना निलंबन किंवा रु.१०,०००/- दंड आणि तिसरा गुन्हा असल्यास १५ दिवस परवाना निलंबन किंवा रु.१५,०००/- दंड आकारण्याबाबत प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, गडचिरोली यांच्या दिनांक २७.०२.२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला आहे.

सन २०२४-२०२५ मध्ये मालवाहतूक करणाऱ्या वाहनांच्या तपासणीमध्ये दोषी आढळून आलेल्या एकूण १४०१ वाहनांना एकूण रु.७१,६१,२००/- इतका दंड आकारण्यात आला आहे.

शहरातील प्रमुख चौकांमध्ये वाहतूक नियमनासाठी सिग्नल यंत्रणा, सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबतचा विषय जिल्हा रस्ता सुरक्षा समितीमध्ये प्रस्तावित आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यातील लोककलावंतांना प्रोत्साहन व आर्थिक मदत मिळण्याबाबत**

**(२३) * ९८९३ श्री.गोपिचंद पडळकर (जत), श्री.सुहास बाबर (खानापूर), श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), श्री.रोहित पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्री.बंटी भांगडिया (चिमूर), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पारंपारिक लोककला आणि महाराष्ट्राची संस्कृती जपणाऱ्या कलाकारांना मिळणाऱ्या कार्यक्रमांमध्ये घट होत असून कोरोना महामारीच्या काळात लॉकडाऊनमध्ये यात्रा-जत्रा बंद झाल्याने कलावंतावर उपासमारीची वेळ आली असल्याचे माहे जानेवारी, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वृद्ध साहित्यिक आणि कलाकारांसाठी, कलाकार मानधन योजनेत कोरोना काळात गैरव्यवहार झाल्यामुळे हातावर पोट असलेल्या लोककलावंतांचे मानधन बंद करण्यात आले असून त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, लोककलावंतांच्या मानधन योजनेची व्याप्ती वाढावी यासाठी विशेष समिती नेमून लोककलावंतांना प्रोत्साहन आणि आर्थिक मदत देण्याची मागणी स्थानिक लोकेप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री यांचेकडे माहे एप्रिल, २०२५ मध्ये केली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सन २०२३-२४ या वर्षात मानधनास पात्र ठरलेल्या वृध्द साहित्यक, कलावंताचे मानधन अनेक महिन्यापासून व सांगली जिल्ह्यातील ७५० हून अधिक वयोवृध्द कलाकारांचे मानधनाचे प्रस्ताव गत २ वर्षापासून प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेमध्ये प्रति वर्षी १०० प्रति जिल्हा हा निकष लावला गेल्याने अनेक दिवसांपासून अनेक गरजू कलावंतांना याचा लाभ मिळत नसल्याने ही अट शिथिल करण्यात यावी अशीही मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,
(६) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर मागणीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. आशिष शेलार :** (१) व (२) राजर्षी शाहू महाराज ज्येष्ठ साहित्यिक व कलाकार मानधन सन्मान योजनेतील लोककलावंतांचे मानधन कोणत्याही कारणामुळे कधीही बंद करण्यात आलेले नाही.

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील प्रयोगात्मक कलेच्या प्रकारातील कलाकार, कलासमुह यांना अर्थसहाय्य करण्यास तसेच स्थानिक प्रयोगात्मक कलेतील कलाकारांना व संस्थांना अर्थसहाय्य करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुषंगाने, रुपये ३५.०० कोटी इतक्या रकमेची प्रशासकीय मान्यता दि. ३ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात आली.

त्याअंतर्गत राज्यातील ७३३५ एकल लाभार्थी तसेच प्रयोगात्मक कलाप्रकारातील १०५ कला समुह व संस्थांना दिनांक ३१ मार्च, २०२२ च्या शासन निर्णयान्वये, ३२० कला समूह व संस्थांना दिनांक २८ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये व १०८ कला समूह व संस्थांना दिनांक ३१ मार्च, २०२३ च्या शासन निर्णयान्वये कोरोना पार्श्वभूमीवर अर्थसहाय्य वितरीत करण्यास मान्यता देण्यात आली होती.
(३) हे खरे आहे.
(४) हे खरे नाही. सांगली जिल्हयातील सन २०२२-२०२३ व २०२३-२०२४ करीता प्रतिवर्षी १०० इष्टांकाप्रमाणे एकूण २०० कलाकारांची मंजूरी माहे मार्च, २०२४ मध्ये झालेली आहे. त्यांना नियमित मानधन अदा करण्यात येते. सद्य:स्थितीत सांगली जिल्ह्यातील नवीन व जुने असे एकूण २००० लाभार्थी आहेत.
(५) व (६) सदर योजनेनुसार दि. २२ ऑगस्ट, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्रति जिल्हा ६० इतका इष्टांक होता. त्यामध्ये दि.९ सप्टेंबर, २०१९ वाढ करुन इष्टांक १०० इतका करण्यात आला. तसेच मानधनामध्ये श्रेणीनिहाय दीडपट वाढ करण्यात आली. त्यानंतर सदर योजनमध्ये सुधारणा करण्यात येऊन दि. १६ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये सर्व कलावंतांना सरसकट रुपये ५,०००/- इतके मानधन अदा करण्यात येते.

-----------------

## सावनेर (जि.नागपूर) शहरातील रस्त्यांवरील अतिक्रमणांमुळे अपघातांचे प्रमाण वाढल्याबाबत

**(२४) * ११९३२ डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.नरेंद्र भोंडेकर (भंडारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) शहरातील रस्ते तसेच गणेशपेठ व मोरभवन बसस्थानक येथील वाढती अतिक्रमणे व वाहतूक पोलिसांच्या निष्काळजीपणामुळे मोठ्या प्रमाणावर अपघातांची संख्या वाढली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अपघातात एका महिलेला प्राण गमवावा लागला असून मृत महिलेचे नातेवाईक गंभीर जखमी झाल्याचे दिनांक २८ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन त्यानुषंगाने सर्व अतिक्रमणे तातडीने हटविणे, अपघातांचे वाढते प्रमाण रोखण्याकरिता उपाययोजना करणे, बाधित कुटुंबियांना आर्थिक सहाय्य देण्याबाबत तसेच दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

(२) होय.

नागपूर जिल्हयातील सावनेर पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा हनूमान मंदीरचे समोर गांधी चौक सावनेर येथे दिनांक २८.०४.२०२५ रोजी अपघात घडलेला असून त्यात एका महिलेचा मृत्यू झाला आहे. याबाबत सावनेर पोलीस स्टेशन नागपूर ग्रामीण येथे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

(३) अपघाताचे प्रमाण रोखण्यासाठी अतिक्रमण हटविण्याकरिता नगरपरिषद सावनेर व पोलीस स्टेशन सावनेर यांनी संयुक्तरीत्या मोहिम राबविली आहे.

अवैध दुकाने व नियम भंग करणाऱ्या वाहन चालकांवर वेळोवेळी कार्यवाही करण्यात आली आहे. Save Life Foundation तसेच वाहतूक शाखा मार्फत विशेष मोहिम राबविण्यात येत आहे.

सदर गुन्ह्यात बाधित कुटुंबियांना मदत मिळणेकरिता पोलीस स्टेशन सावनेर यांनी मोटार वाहन दावा प्राधिकरण नागपूर यांच्याकडे Detail Accident Report प्रस्ताव पाठविला आहे. सदर घटनेतील दोषींवर संबंधित न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

सदर प्रकरणातील दोषीविरुध्द प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पुणे जिल्ह्यातील वारजे भागात (रामनगर) विजेचा धक्का लागून बालकाचा झालेला मृत्यू

**(२५) * ७५६६ श्री.भिमराव (आण्णा) धोंडिबा तापकीर (खडकवासला), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील वारजे भागात (रामनगर) विजेचा धक्का लागून कु.मयंक प्रदीप आडगळे या १० वर्षीय बालकाचा मृत्यू झाल्याचे दिनांक १४ मे २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर मुलास घरासमोर असलेल्या लोखंडी विजेच्या खांबामध्ये वीज प्रवाहित होत असल्याने मृत्यू झाला असून, यापुर्वी देखील अशा प्रकारच्या घटना या भागात घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वीज वितरण कंपनीकडून विजेच्या खांबाची नियमित सुरक्षा तपासणी व देखभाल करण्यात येत नसून संबंधित अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मृताच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देणे, विजेच्या खांबांची नियमित सुरक्षा तपासणी व देखभाल करणे, अशा घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत तसेच यास जबाबदार असलेल्या दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) मारुती मंदिर चौक, रामनगर, वारजे माळवाडी, पुणे येथे दि.२०.५.२०२५ रोजी रात्री ०९.०० वाजताच्या सुमारास कु.मयंक प्रदिप अडागळे हा १० वर्षीय बालक घरासमोर असलेल्या महावितरण कंपनीच्या विद्युतभारीत लोखंडी विजेच्या खांबाच्या संपर्कात आल्याने वीजेचा धक्का बसून त्याचा मृत्यू झाला आहे.

परंतू, अशा प्रकारच्या इतर घटना या भागात घडल्याचे निदर्शनास आलेले नाही.
(३) व (४) सदर प्राणांतिक अपघाताची चौकशी विद्युत निरीक्षक, विद्युत निरीक्षण विभाग यांचेमार्फत करण्यात आली आहे. त्यानुसार, अति. कार्यकारी अभियंता, महावितरण यांना कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात आली होती. सदर प्राणांतिक अपघात हा महावितरणच्या वीज संच मांडणीवर झाला असल्यामुळे विद्युत निरीक्षक कार्यालयाने दि.१९.०६.२०२५ अन्वये महावितरण कंपनीस या संबधितांना नुकसान भरपाई अदा करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार, अपघातग्रस्त व्यक्तींच्या नातेवाईकांस तातडीची मदत म्हणून रु.२०,०००/- दिले असून उर्वरित रु.३,८०,०००/- (धनादेश क्र.२०७३४७) देण्याची कार्यवाही सुरु आहे.

घटनास्थळावरील वीज संचमांडणी तसेच परिसरातील इतर लोखंडी खांबावर उभारलेल्या विज संचमांडणीमध्ये आवश्यक त्या दुरुस्ती महावितरण कंपनीमार्फत करण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**राज्यात मोठ्या प्रमाणात होणारे वायू प्रदूषण रोखण्याबाबत**

**(२६) * ७९६० श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.साजिद पठाण (अकोला पश्चिम), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.राजन नाईक (नालासोपारा), कॅप्टन आर. सेल्वन (सायन-कोळीवाडा), ॲड.पराग अळवणी (विलेपार्ले), श्री.नरेंद्र मेहता (मिरा भाईंदर), श्री.महेश (दादा) किसन लांडगे (भोसरी), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.अनंत (बाळा) नर (जोगेश्वरी पूर्व), श्री.मुरजी (काका) पटेल (अंधेरी पूर्व), डॉ.राहूल पाटील (परभणी), श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.महेश सावंत (माहिम), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.मनोज जामसुतकर (भायखळा), श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर), श्री.प्रकाश सुर्वे (मागाठाणे), श्री.अबू आझमी (मानखुर्द शिवाजीनगर), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई, मुंबई उपनगरे, नागपूर व पुणे येथे गेल्या काही महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात वायू प्रदुषणात वाढ होवून हवेचा दर्जा अत्यंत खालावलेला असल्याने नागरीकांना अनेक आरोग्यांच्या समस्यांचा सामना करावा लागत असल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील वाढत्या बांधकांमामुळे प्रदूषणाची आणि हवेच्या गुणवत्तेची अचूक स्थिती कळण्यासाठी बांधकामे सुरु असलेल्या ठिकाणावर प्रदूषण देखरेख उपकरण बसविण्याचे आदेश देण्यात आले असूनही त्याची अंमलबजावणी करण्यात आली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुंबई महानगर प्रदेशात वायु प्रदूषणास कारणीभूत ठरणाऱ्या बेकऱ्या- भट्टयांमध्ये लाकूड व कोळसा इत्यादींचा वापर करण्यात येऊ नये असे निदेश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिले असल्याने राज्यातील सर्व महानगरपालिका, नगरपालिका यांनी सदर भट्टया, बेकऱ्या व रेस्टॉरंट इत्यादींना गॅस, सीएनजी किंवा हरित इंधन पुरविण्याच्या दृष्टीने कोणती व्यवस्था केली आहे,
(४) असल्यास, राज्यात हवा प्रदूषणाची पातळी खालावली असल्याने रेसपायर लिविंग साई सायन्सेस या संस्थेने केलेल्या अभ्यासात महानगरपालिका व प्रदूषण नियंत्रण मंडळाने एकत्रित मोहिम राबवून हवा प्रदुषण रोखण्याबाबत तसेच हवेचा गुणवत्ता निर्देशांक नोंदविण्यासाठी किमान प्रत्येक वार्डात एक संयंत्र बसविण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, या संपूर्ण प्रकरणाची चौकशी करुन प्रदुषण रोखण्याबाबत तसेच व यात दोषी असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त अहवालानूसार मुंबई शहर व उपनगरामध्ये बांधकामाच्या ठिकाणी प्रदूषणाची आणि हवेच्या गुणवत्तेची अचूक स्थिती कळण्यासाठी बांधकाम सुरु असलेल्या ठिकाणावर प्रदूषण देखरेख उपकरण बसविण्याचे निर्देश दिले आहेत. यानुषंगाने कार्यवाही सुरू आहे.
(३) हे खरे आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्याकडून प्राप्त अहवालानुसार सदर भट्टया, बेकऱ्या, रेस्टॉरंट इत्यादींना गॅस, सीएनजी किंवा हरित इंधन पुरविण्याच्या दृष्टीने बेकरी असोसिएशन, बृहन्मुंबई मनपा आयुक्त, महानगर गॅस, अग्निशमन अधिकारी, इ. समवेत आयोजित संयुक्त बैठक झालेली असून यांच्या उपलब्धतेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) अंशत: खरे आहे.

केंद्रिय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकानुसार मुंबईमध्ये पुरेशी हवेची गुणवत्ता नोंदविणारी एकूण २८ CAAQM Stations आहेत. तसेच, नवीन ५ CAAQM Stations बसविण्याचे प्रस्तावित आहे.
(५) (i) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत मुंबई महानगर क्षेत्रातील २२६ उद्योगांना कारणे दाखवा नोटिस, १०५- उद्योगांना कारणे दाखवा नोटिस, २१३ उद्योगांना अंतरिम नोटिस, ४९-उद्योग बंदचे नोटिस देण्यात आली आहे.
(ii) नागपूर महानगरपालिकेच्या नवीन हवा-प्रदूषण कृती आराखड्यास मान्यता मिळाली आहे.
(iii) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने २ मोबाईल रोड शॉवर व ५ मुव्हेबल फ़ॉग कॅनॉन डस्ट सप्रेशन सिस्टिम ची वाहणे कार्यान्वित केलेली आहेत. ६ ठिकाणी Air purification system व १३- ठिकाणी-Automizer/Dry Mist Fountain बसविण्यात आले आहेत.
(iv) मुंबई महानागरपालिकेमार्फ़त वायु प्रदूषण शमन योजना-२०२३ प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. तसेच ऑक्टोबर, २०२४ पासून बांधकामाकरिता सर्वकष मार्गदर्शक तत्त्वे / सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

----------------

## वाघाडीगांव (ता.डहाणू, जि.पालघर) येथील भीम बांधावर पर्यटनासाठी आलेल्या महिलेचा झालेला मृत्यू

**(२७) * ७२०१ श्रीमती स्नेहा दुबे (वसई), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्रीमती ज्योती गायकवाड (धारावी), श्री.विश्वजित कदम (पलूस कडेगाव), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.संजय मेश्राम (उमरेड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाघाडीगांव (ता.डहाणू, जि.पालघर) येथील पर्यटनस्थळी पाण्याची खोली, प्रवाहाची माहिती, फलक नसल्याने तसेच आपत्कालिन संपर्क व जीवरक्षक साधने उपलब्ध नसल्याने भीम बांधावर पर्यटनासाठी आलेल्या श्रीमती मीना पराड या महिलेचा दिनांक १ मे, २०२५ रोजी मृत्यू झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागातील अनेक रिसॉर्ट व पर्यटन स्थळांच्या जलतरण तलावात सुरक्षेच्या नियमांचे पालन केले जात नसून याकडे स्थानिक प्रशासनाकडून दुर्लक्ष केले जात असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुषंगाने सदर ठिकाणी अशा घटनांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता प्रतिबंधात्मक कार्यवाही करुन बाधितांच्या नातेवाईकांना आर्थिक मदत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शंभूराज देसाई :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) राज्यातील पर्यटन विभागामार्फत घोषित केलेली पर्यटनस्थळे (अ, ब व क वर्ग स्थळे) इ. ठिकाणी पर्यटकांसाठी सुरक्षा नियमांचे पालन करण्याबाबत सूचना फलक दर्शनी भागावर लावण्यात आले असून त्याबाबत विविध माध्यमाद्वारेसुध्दा वेळोवेळी अवगत करण्यात येते. पर्यटन स्थळी उदभवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीमध्ये जीवरक्षक साधने उपलब्ध करून देणे तसेच मदतीसाठी संपर्क व्यवस्था याबाबतच्या सूचना ठळकपणे दर्शनीय ठिकाणी लावण्यात येतात.

पर्यटन विभागाकडे नोंदणीकृत रिसॉर्टसमध्ये पर्यटकांच्या सुरक्षेबाबत तसेच पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत निर्गमित करण्यात येणाऱ्या अधिसूचना, नियमांचे अनुपालन करण्याबाबत वेळोवेळी आढावा घेऊन सुरक्षा नियमांचे पालन /अंमलबजावणी करण्याबाबतची जबाबदारी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यावर सोपवण्यात आलेली आहे.

पर्यटन स्थळांच्या ठिकाणी पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देण्याकरिता पर्यटन विभागामार्फत विकसित केलेल्या आणि विकसित करण्यात येत असलेल्या सर्व मालमत्तांची सुरक्षात्मक तपासणीबाबत (safety audit) सर्व जिल्हाधिकाऱ्यांना कळविण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि. नाशिक) शहरातील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कनिष्ठ लिपिक पदाची खोटी कागदपत्रे बनवून शासनाची केलेली फसवणूक

**(२८) * १२७८७ श्री.मुफती मोहम्मद इस्माईल अब्दुल खालीक (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहरातील संगमेश्वर भागातील श्री.यादवराव नारायण जाधव माध्यमिक व उच्च माध्यमिक विदयालयात कनिष्ठ लिपिक पदाची खोटी कागदपत्रे बनवून शासनाची ४५ लाखांची फसवणूक केल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात छावणी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कठोर कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

श्री.यादवराव नारायण जाधव माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात कनिष्ठ लिपिक पदाची खोटी कागदपत्रे बनवून शासनाची ४५ लाखांची फसवणुक केल्याची घटना घडली आहे.
(२) होय,

मालेगाव छावणी पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ९८/२०२५ भा.न्या.सं. कलम ३१८(४), ६१(२), ३(५) सह वाढीव कलम भा.न्या.सं.२०२३ चे कलम ३३६(२), ३३७, ३३८, ३४०(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.
(३) मा.न्यायालयाच्या आदेशानुसार BNSS १७५(३) अन्वये वरिलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर प्रकरणी पुढील तपास चालु आहे.
(४) विलंब नाही.

-----------------

## भिवंडी (जि.ठाणे) येथील प्रदूषणात दिवसेंदिवस वाढ होत असल्याबाबत

**(२९) * १२९९४ श्री.अबू आझमी (मानखुर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) मधील प्रदूषण दिवसेंदिवस वाढत चालले असून शहरातील पावरलुम उद्योगातील सुती धाग्यांवर कांजी प्रक्रिया करणारे सायजिंग आणि कपड्यांवर रंग प्रक्रिया करणारी डाईंग कंपनी प्रदूषणयुक्त कचरा जाळत असून यामुळे चिमण्यांमधून निघणाऱ्या विषारी वायुमुळे शहरातील नागरिकांमध्ये श्वसनाचे आजार वाढत असल्याचे दिनांक ५ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रदूषण नियंत्रण बोर्डद्वारा दिनांक ३ जून, २०२३ रोजी ४३० कंपन्यांना कारवाई करत १०७ कंपन्यांना बंद करण्याचे आदेश देवून ४९ कंपन्यांना अंतिम नोटीस, ६५ कंपन्यांना प्रस्तावित आदेश, १४९ कंपन्यांना कारणे दाखवा नोटीस देवूनही सदर आदेश फक्त कागदावरच असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

आरोग्य अधिकारी, भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका यांचेकडून प्राप्त अहवालानुसार विषारी वायुमुळे शहरातील नागरिकांमध्ये श्वसनाचे आजार वाढत असल्याचे रुग्ण आढळून आलेले नाहीत.

(२) व (३) हे खरे नाही.

जून, २०२२ ते मे, २०२५ या कालावधीत १४९- कारखान्यास कारणे दाखवा नोटीस, ६५-कारखान्यास प्रस्तावित आदेश, ४९-कारखान्यांस अंतरिम आदेश देण्यात आले असून सदर कंपन्यांनी अनुपालन अहवाल सादर केला आहे. तसेच बंदचे आदेश दिलेल्या १६७ पैकी ३१ कारखान्यांना पुन्हा सुरु करण्याबाबतचे आदेश देण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील आपले सरकार सेवा केंद्रामार्फत दिल्या जाणाऱ्या सेवांच्या शुल्कात वाढ केल्याबाबत**

**(३०) * ७५५० श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण), श्री.रईस शेख (भिवंडी पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.हेमंत ओगले (श्रीरामपूर), श्री.रामदास मसराम (आरमोरी), श्री.प्रविण दटके (नागपूर मध्य), श्री.संजय देरकर (वणी), श्री.समाधान आवताडे (पंढरपूर) :** सन्माननीय **माहिती तंत्रज्ञान मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शासनाच्या विविध विभागांनी अधिसूचित केलेल्या सर्व सेवा ग्रामीण भागातील तसेच शहरी भागातील महानगरपालिका, नगरपालिकांना 'आपले सरकार सेवा केंद्रातून' उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आपले सरकार सेवा केंद्रामार्फत दिल्या जाणाऱ्या सर्व योजना, जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला व अधिवास प्रमाणपत्र, तक्रारी इत्यादी ऑनलाईन शासकीय सेवांच्या शुल्कात शासनाकडून दुपटीने वाढ करण्यात आली असून याकरीता स्वतंत्र कर्मचारीवर्ग देखील नेमण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच प्रत्येक ग्रामपंचायतीत केंद्र स्थापन करण्यात आली असून याकरिता पूर्वी संजय गांधी योजनेच्या दाखल्याकरिता ४५ रुपये घेतले जात होते परंतु, आता शासनाने नव्याने शासन निर्णय काढून एका दाखल्यासाठी १०० रुपये व घरपोच दाखल्यासाठी शुल्क दुप्पट करण्यात आले असल्याने ग्रामीण भागातील नागरिकांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अत्यावश्यक सेवांच्या शुल्कात दुपटीने वाढ केल्यामुळे विद्यार्थ्यांना तसेच सर्वसामान्य नागरिक तसेच शेतकरी यांना आर्थिक ताण सहन करावा लागत असल्याने शुल्क आकारणी कमी करण्याची मागणी होत आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन याकरीता स्वतंत्र कर्मचारीवर्ग नेमण्यासह शासकीय सेवांच्या शुल्कात केलेली वाढ कमी करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. आशिष शेलार :** (१) होय, हे खरे आहे.

महागाईमध्ये दिवसेंदिवस वाढ झाल्यामुळे महाआयटी आणि केंद्रचालक यांनी केलेली विनंती विचारात घेऊनच सा.प्र.वि.,शा.नि. क्रमांक आसेकें १७२५/प्र.क्र.८६/मातं(३९), दि.२७.०३.२०२५ अन्वये दिर्घ कालावधीनंतर प्रथमच आपले सरकार सेवा केंद्रावरुन देण्यात येणाऱ्या सेवांच्या बदल्यात रु.२०/-(कर वगळून) वरुन रु.५०/- (कर वगळून) अशी दरवाढ करण्यात आली आहे. याचबरोबर नागरिकांच्या सोयीसाठी प्रत्येक घरपोच सेवेसाठी रु.१००/- (कर वगळून) इतके शुल्क निश्चित करण्यात आले आहे.घरपोच सेवा घेणे नागरिकांना बंधनकारक केलेले नाही.

(२) हे खरे नाही. शासन निर्णय दिनांक २७.०३.२०२५ अन्वये दिर्घ कालावधीनंतर जरी सेवाशुल्काच्या दरात वाढ करण्यात आली असली तरी, २०११ ची जनगणना आधारभूत मानून आपले सरकार सेवा केंद्रांची संख्याही दुप्पट करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

(३) हे अंशत: खरे आहे. जिल्हाधिकारी गडचिरोली यांनी कळविलेल्या माहितीनुसार पूर्वी संजय गांधी योजनेतील दाखल्याकरीता रु.३३.६०/-रक्कम आकारणी केली जात होती. परंतु सद्यस्थितीत रु.६९/- इतके शुल्क आकारण्यात येत आहे. तसेच ग्रामपंचायती मार्फत देण्यात येणाऱ्या सेवांपैकी काही सेवा नि:शुल्क तर काही सेवांसाठी ग्रामविकास विभाग शासन निर्णय दि.१३/०२/२०१९ नुसार शुल्क आकारण्यात येते. सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय दिनांक २७ मार्च, २०२५ नुसार आपले सरकार पोर्टलवर प्रत्येक घरपोच सेवेच्या नोंदणीसाठी रु.१००/- एवढे शुल्क निश्चित करण्यात आले असल्याने, गोरगरीब नागरीकांमध्ये नाराजी निर्माण झाली असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई शहरातील आपत्कालीन परिस्थितीत धोक्याची सुचना देणारी सायरन प्रणाली अद्ययावत करण्याबाबत

**(३१) * १००९५ श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने 'ऑपरेशन अभ्यास' अंतर्गत मॉक ड्रिल्स आयोजित केल्या असून त्यामध्ये सायरन प्रणाली, ब्लॅक आउट्स आणि आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणांची चाचणी घेण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील २७२ सायरन पैकी केवळ ३९ सायरन कार्यरत असून उर्वरित सायरन प्रणाली कालबाह्य झाल्यामुळे आपत्कालीन प्रसंगी नागरिकांना वेळेवर इशारा देण्यास असमर्थ आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सन २००५ च्या महापुरानंतर मुंबईतील सायरन प्रणाली बंद झाली असून, त्यानंतर ती पुर्नसंचालित किंवा अद्ययावत करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त सायरन प्रणाली अद्ययावत करण्यासह नवीन प्रणाली बसविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

केंद्र शासनाच्या सूचनांनुसार दि.०७/०५/२०२५ रोजी मुंबई सह ठाणे, पुणे, नाशिक, उरण (रायगड), तारापूर (पालघर), रत्नागिरी, सिंधुदुर्ग या शहर/जिल्ह्यांत नागरी संरक्षण कार्यालयांनी विविध ठिकाणी कार्यरत असलेले भोंगे वाजवून मॉक ड्रिल व ब्लॅक आऊट घेण्यात आले. मॉक ड्रिल दरम्यान मुंबईमध्ये ४५ ठिकाणी भोंगे वाजवून नागरीकांना इशारा देण्यात आला होता.

(३) व (४) हे खरे नाही.

बृहन्मुंबई व इतर नागरी संरक्षण शहरांमधील भोंगा इशारा प्रणालीचे नुतनीकरण करुन सदर प्रणाली अद्ययावत करण्याकरिता सदर प्रणालीची चाचणी घेण्यासाठी दि.२४/०१/२०२५ च्या शासन निर्णयान्वये संचालक, नागरी संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आलेली आहे.

नागरी संरक्षण संचालनालयाने दि.०८/०५/२०२५ च्या पत्रान्वये बृहन्मुंबई व इतर नागरी संरक्षण शहरांमधील भोंगा इशारा प्रणालीचे नुतनीकरण करणेबाबत एकूण १५० भोंगे बसविण्यासाठी रु.४.५० कोटी इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्ताव सादर केला होता. सदर प्रस्तावास आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून तातडीची बाब म्हणून आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ च्या कलम ५० अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन थेट खरेदी करण्यासाठी निधी उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आली आहे.

त्यानुसार, दि.०९/०५/२०२५ च्या पत्रान्वये, भोंगे खरेदी करण्यासाठी संचालक, नागरी संरक्षण यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात आली असून खरेदीबाबतची पुढील कार्यवाही करण्याबाबत सदर पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे. त्यानुसार नागरी संरक्षण संचालनालयामार्फत पहिल्या टप्प्यात एकूण १४२ भोंगे खरेदी करण्यात आलेले असून त्यांचे बृहन्मुंबई महानगरपालिका व जिल्हा नियंत्रक नागरी संरक्षण कार्यालये येथे वाटप करण्यात आलेले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## गोवंडी (मुंबई) येथील देवनार परिसरातील मोठ्या प्रमाणात होणारे वायू प्रदूषण रोखण्याबाबत

**(३२) * ९९४८ श्रीमती सना मलिक (अणुशक्ती नगर), श्री.अबू आझमी (मानखूर्द शिवाजीनगर) :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गोवंडी (मुंबई) येथील देवनार परिसरातील डंपिंग ग्राउंड, एसएमएस कंपनी, कचरा प्रक्रिया प्रकल्प, जैव वैद्यकीय कचरा जाळणारे यंत्र, विषारी धुर व इतर प्रदूषणजन्य घटकांमुळे मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण होत असल्याने नागरीकांना अनेक आजारांचा त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त ठिकाणी FDC Concrete आणि Al Abbas Concrete या दोन रेडी मिक्स कॉक्रीट (RMC) प्रकल्पांनी पर्यावरण नियंत्रण व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या (MPCB) नियमांचे उल्लंघन केल्याबाबत दिनांक २७ फेब्रुवारी, २०२५ रोजी कायदेशीर नोटीस बजाविण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त परिसरातील हवा गुणवत्ता निर्देशांक (Air Quality Index) सरासरीपेक्षा अधिक खराब राहत असल्याने नागरीकांचे आर्युमान कमी होणे, क्षयरोग, अस्थमा, कॅन्सर, फुफुसांचे विकार तसेच गरोदर स्त्रियांवर व त्यांच्या बाळांवर परिणाम होत असून नवजात बालकेही अंपग तसेच गतीमंद यासारखी विकृती घेवून जन्मास येणे अशा अनेक समस्यांचा नागरीकांना सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर कंपन्या व डम्पिंग ग्राउंड विरोधात प्रश्न उपस्थित करुन तसेच विविध आंदोलने करुनही कंपनी विरोधात कोणतीच कारवाई करण्यात आली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन देवनार डम्पिंग ग्राउंड व सदर कंपनीतुन निघणाऱ्या विषारी वायूमुळे होणारे वायुप्रदूषण रोखण्यासह नागरीकांच्या आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम रोखण्याबाबत कोणती प्रतिबंधात्मक कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

प्रश्नाधिन परिसरात FDC Concrete आणि Al Abbas Concrete या दोन रेडी मिक्स कॉक्रीट (RMC) प्लांट अस्तित्वात नाहीत.

(३) हे खरे नाही.

बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून दि.१८/०६/२०२५ रोजीच्या प्राप्त अहवालानुसार श्वसन विकाराच्या आजारात दमा आणि खोकला या आजाराच्या रुग्णसंख्येत लक्षणीय वाढ झाल्याचे आढ़ळून आले नाही. तसेच क्षयरोग, अस्थमा, कॅन्सर, फुफुसांचे विकार, गरोदर स्त्रियांवर व त्यांच्या बाळांवर परिणाम होत असल्याचे व नवजात बालके ही अंपगत्व,गतीमंद सारखी विकृती घेवून जन्मास येत असल्याची बाब निदर्शनास आली नसल्याचे नमूद केले आहे.

(४) हे खरे नाही.

(५) मे.एस.एम. एन्व्होक्लीन प्रा.लि. या सामुहिक जैव वैद्यकिय कचरा प्रक्रिया व विल्हेवाट सुविधा केंद्रास मा.उच्च न्यायालयाने एकत्रितरित्या सदरील सुविधा केंद्र पुढ़ील दोन वर्षात स्थलांतरीत करण्याचे आदेश दिलेले असून यानुसार सदर प्रकल्प जांबीवली, अंबरनाथ येथे स्थलांतरीत करण्याबाबत कारवाई सुरु आहे.

-----------------

## नवी मुंबईच्या सागरी सुरक्षेसाठी असलेल्या बोटींची दुरवस्था झाल्यामुळे सागरी सुरक्षा धोक्यात आल्याबाबत

**(३३)** * **९४७९ श्री.योगेश सागर (चारकोप), श्री.राजन नाईक (नालासोपारा) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर मुंबईसह लगतच्या शहरांच्या सागरी सुरक्षेवर विशेष लक्ष दिले जात असून सन २०१२ मध्ये नवी मुंबईच्या सागरी सुरक्षेसाठी १) इंद्रायणी २) सागराधीश ३) तरण ४) सुरक्षा ५) शक्ती ६) पाताळगंगा व ७) कर्नाळा या सात गस्ती बोटी शासनाने पोलिसांकडे सोपविल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या सातही गस्ती बोटींची दुरवस्था झाली असल्याने सदय:स्थितीत भाड्याच्या तीन बोटींवर सागरी गस्त सुरू असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, किनारपट्टीवर गस्त घालण्यासाठी भाड्याने घेतलेल्या तीन बोटींचा पोलीस गत ११ महिन्यापासून वापर करीत असले तरी या बोटी अद्ययावत व अधिक क्षमतेच्या नसल्याने सागरी किनारपट्टीत गुन्हेगारी वाढण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी करुन शहरांच्या सागरी सुरक्षेकरीता नवीन अद्ययावत बोटी कार्यान्वित करून सागरी सुरक्षा बळकट करण्याकरिता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

सन २००२ इंद्रायणी, सन २००९ पाताळगंगा व कर्नाळा, सन २०१० शक्ती व सुरक्षा व सन २०११ तरंग व सागराधीश याप्रमाणे एकुण ०७ पोलीस नौका शासनाकडून सागरी गस्तीकरिता नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकरिता सोपविण्यात आल्या होत्या.

(२) व (३) नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या सागरी कार्यक्षेत्राचे सागरी गस्तीकरिता शासनाकडून एकुण ०७ पोलीस नौका देण्यात आल्या होत्या. त्यापैकी इंद्रायणी या नौकेचे निर्लेखिकरणाची प्रक्रिया सुरू आहे. सागराधीश नौकेच्या आधुनिकीकरणाची पुढील कार्यवाही सुरू आहे. तसेच तरंग नौका (Mid-life up gradation) आधुनिकीकरण करणे करिता विचारधीन आहे.

सदरच्या सागरी गस्तीकरिता देण्यात आलेल्या पोलीस नौकांना १४ ते १६ वर्षे कालावधी झालेला असून सागरी गस्तीकरिता सततच्या वापरामुळे नौकांची कार्यक्षमता कमी झालेली आहे व पोलीस नौकांचे नादुरुस्तीचे प्रमाण वाढलेले आहे. त्याकारणास्तव सद्य:स्थितीत पोलीस नौका नादुरुस्त असल्याने बंद स्थितीत आहेत.

नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाकरिता शासनाकडून सन २०२५-२०२६ या वर्षाकरिता एकुण ०४ खाजगी भाडेतत्वावरील नौका सागरी गस्तीकरिता देण्यात आलेल्या आहेत. सद्य:स्थितीत पावसाळा कालावधी असल्याने, आपात्कालीन व आणीबाणीच्या परिस्थितीच्या अनुषंगाने ०१ खाजगी नौकेद्वारे नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या सागरी / खाडी कार्यक्षेत्रात दैनंदिन सागरी गस्त सतर्कपणे करण्यात येत आहे. तसेच नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाच्या सागरी / खाडी किनारपट्टीमध्ये कोणत्याही प्रकारच्या आक्षेपार्ह घटना घडल्या नसल्याने त्याबाबत कोणत्याही प्रकारचे गुन्हे दाखल झालेले नाहीत.

(४) **१. बोटींचे आधुनिकीकरण-** शासन निर्णय क्र.पीईक्यु-०२२३/प्र.क्र.२९/पोल-४, दि.२५.०९.२०२४ अन्वये मुंबई घटकातील १३ बोटी तसेच शासन निर्णय क्र.पीईक्यु-०२२३/प्र.क्र.२९/पोल-४, दि.१३.१२.२०२४ अन्वये उर्वरीत घटकांतील ०७ अशा एकुण २० बोटीचे आधुनिकीकरण करण्याबाबत मान्यता देण्यात आली आहे. सदर शासन निर्णयातील लेखाशिर्षाबाबत दुरूस्ती करुन शासन शुध्दीपत्रक दि.२५.०३.२०२५ रोजी काढण्यात आले आहे. यामध्ये नवी मुंबईच्या आस्थापनेवरील सागराधीश बोटीचा समावेश आहे. त्याअनुषंगाने आधुनिकीकरणाची प्रक्रिया सुरु आहे.

सद्यःस्थितीत २० पैकी पोलीस आयुक्त, मुंबई यांचेकडील ०४ बोटींचे आधुनिकीकरण करण्यात आले असुन उर्वरित १६ बोटींचे आधुनिकीकरण करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

२. **बोटींची देखभाल दुरुस्ती-** शासन निर्णय क्र.पीईक्यु-२२२/प्र.क्र.२७०/पोल-४, दि.२८.०३.२०२५ अन्वये पोलीस गस्त नौकांच्या देखभाल दुरुस्ती सेवा करार विपोमनि, मोटार परिवहन पुणे यांचे कार्यालयाकडुन कार्यवाही सुरु आहे.

३. **नवीन बोट खरेदी-** शासन निर्णय क्र.पीईक्यु-०२२३/प्र.क्र.२९/पोल-४, दि.१४.०२.२०२४ रोजीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्याच्या सागरी सुरक्षा गस्तीकरिता नवीन २० बोटी खरेदी करण्याकरिता एकुण रु.११७.६० कोटी इतक्या रकमेच्या खर्चास शासनाकडून प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. सद्यःस्थितीत नवीन बोटी खरेदी करण्याकरिता अपर पोलीस महासंचालक, नियोजन व समन्वय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकडून कार्यवाही सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड व शिरूर (का.) (जि.बीड) तालुक्यामध्ये कंत्राटदारांनी विद्युत विकास कामांमध्ये केलेला गैरव्यवहार

**(३४)** * **१०६९४ श्री.संदिप क्षीरसागर (बीड) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड व शिरूर (का.) (जि.बीड) तालुक्यामध्ये कंत्राटदारांनी विविध लेखाशिर्ष अंतर्गत विद्युत विकास कामांमध्ये मोठ्या प्रमाणावर देखभाल-दुरुस्तीमध्ये निकृष्ट दर्जाचे काम व अनियमितता केल्याच्या तक्रारी स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्याकडे प्राप्त आहेत, हे ही खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०२०-२१ ते फेब्रुवारी, २०२५ या काळात सामाजिक विकास योजना २०२४-२५, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर अनुसुचित जाती व जमाती व अल्पसंख्यांक २२२५ एफ ०८२५, २५१५-१२३८, दलितवस्ती पंचायत समितीस्तर, तांडावस्ती सुधार योजना, ग्रा.पं.स्तर वित्त आयोग व इतर योजनेतून विद्युत दुरुस्तीची कामे करण्यात आली आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी आतापर्यंत ४६ कामांमधील कार्यारंभ आदेश व इतर कार्यारंभ आदेशामध्ये शासन निधीमध्ये गैरव्यवहार झाला असून, सन २०२०-२१ ते माहे फेब्रुवारी, २०२५ या दरम्यान करण्यात आलेले कार्यारंभ आदेश, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता याबाबतच्या विषयांची चौकशी त्रयस्त समितीच्या वतीने करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे दिनांक १७ मे, २०२५ रोजीच्या पत्राद्वारे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. संजय शिरसाट :** (१) हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
सन २०२०-२१ ते फेब्रुवारी, २०२५ या कालावधीमध्ये विविध योजनांतून विद्युत दुरूस्तीची काम करण्यात आली नसून विद्युत विकासाची कामे करण्यात आली आहेत.
(३) हे खरे आहे.
(४) कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग क्र.१, जिल्हा परिषद, बीड यांच्यामार्फत चौकशी समिती नेमण्यात आलेली असून चौकशीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**आलेगाव (ता.जि.नांदेड) शिवारातील विहिरीत ट्रॅक्टर कोसळून शेतमजुरांचा मृत्यू झाल्याबाबत**

**(३५) * ७१५३ श्री.धनंजय मुंडे (परळी), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आलेगाव (ता.जि.नांदेड) शिवारात शेतमजुरांची वाहतूक करणारा ट्रॅक्टर ट्रॉली कठडे नसलेल्या विहिरीत कोसळल्यामुळे झालेल्या अपघातात ७ मजूर महिलांचा मृत्यू झाला असून काही जण जखमी झाल्याची घटना माहे एप्रिल, २०२५ मध्ये घडली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतात काम करणाऱ्या मजुरांच्या सुरक्षिततेसाठी आणि अशा अपघातांना प्रतिबंध घालण्यासाठी शासनाने कोणती सुरक्षा मानके ठरविली आहेत तसेच कोणत्या उपाययोजना करण्यात येत आहे,
(३) असल्यास, या घटनेच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबियांना तातडीची आर्थिक मदत आणि जखमींवर वैद्यकीय उपचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
माहे एप्रिल, २०२५ मध्ये सदर घटना घडली आहे. या घटनेत ७ मजूर महिलांचा मृत्यू झाला असुन तिघांना गंभीर दुखापत झालेली आहे.
(२) सदर घटनेच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याकरिता जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड यांनी सर्व विभाग प्रमुखांना पत्रान्वये आदेश पारित केले आहे.

(३) होय, सदर घटनेच्या कारणांची चौकशी करण्यात आली असुन पोलीस स्टेशन लिंबगांव, तालुका जिल्हा नांदेड येथे ट्रॅक्टर चालक व मालक या दोघं आरोपींविरुध्द गु.र.नं. ३३/२०२५ भा.न्या.सं. कलम १०५, २८१, १२५(A), १२५(B), ३ (५) व मोटार वाहन कायदा सहकलम १३४/१७७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच या दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबाना महाराष्ट्र शासनाकडून प्रत्येकी ५ लाख रुपये आर्थिक मदत देण्यात आली आहे.

(४) विलंब नाही.

-----------------

**वणी (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील गॅस गोडावूनमध्ये तरुणीवर झालेला अत्याचार**

**(३६) * ९७४८ श्री.संजय देरकर (वणी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वणी (ता.वणी, जि.यवतमाळ) येथील निर्गुडा नदीजवळील गॅस गोडावूनच्या मागे असलेल्या निर्जन ठिकाणी विटांचे तुकडे गोळा करण्यासाठी गेलेल्या १८ वर्षीय तरुणीवर एका व्यक्तीने अत्याचार केल्याची घटना दिनांक १ मे, २०२५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी स्थानिक पोलीस स्थानकात पिडित तरुणीच्या कुटुंबियांनी तक्रार दाखल केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधितांविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) सदर प्रकरणी फिर्यादीचे फिर्यादीवरुन पोलीस स्टेशन वणी, जि.यवतमाळ येथे गु.र.क्र.३३१/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ६४ (१), ६४(२) (i), १३८, ७६, ११५ (२) अन्वये दि.०२.०५.२०२५ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) सदर गुन्ह्यातील आरोपीस दि.०८.०५.२०२५ रोजी अटक करण्यात आली असून, आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे. आरोपीविरुध्द दोषारोप पत्र दाखल करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**चंद्रपूर येथील सुपर थर्मल पॉवर स्टेशन परिसरात ताडपत्री विना राखेची वाहतूक होत असल्याबाबत**

**(३७) * ११७४५ श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील सुपर थर्मल पॉवर स्टेशन परिसरात ताडपत्री विना राख वाहतूकीमुळे प्रदूषणात वाढ होऊन नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत असल्याने आरटीओ विभागाने सदर वाहनांवर दंडात्मक कारवाई करून टिप्पर जप्त करण्यात आल्याचे माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या भागात प्रदूषण टाळण्यासाठी राख संकलन, वाहतूक आणि व्यवस्थापनासाठी स्वतंत्र धोरण आखण्यात यावे तसेच आरटीओ विभाग किंवा पोलिस प्रशासनाने निरीक्षण यंत्रणा विकसित करावी अशी मागणी करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ताडपत्रीविना राख वाहतूकीमुळे होणारे प्रदूषण रोखण्याकरीता तसेच याबाबत स्वतंत्र धोरणाची आखणी आणि निरीक्षण यंत्रणा विकसीत करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२) व (३) केंद्रीय मोटार वाहन नियमानुसार एकरुप नसलेला माल ताडपत्रीने आच्छादित करुन किंवा बंद कंटेनर द्वारे वाहतूक करणे आवश्यक आहे. राखेची सार्वजनिक रस्त्यावरुन वाहतूक न करता उद्योग प्रकल्पातंर्गत जागेवर राखेची विल्हेवाट लावण्याबाबत प्रकल्प संचालकास प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून सुचित करण्यात आले आहे. तसेच वायुवेग पथकास नियमित तपासणी करण्याबाबत देखील सूचित करण्यात आले आहे.

प्रादेशिक परिवहन, चंद्रपूर कार्यालयामार्फत सन २०२४-२०२५ मध्ये ताडपत्री आच्छादित न करता वाहतूक करणाऱ्या १६९ वाहनांवर कारवाई करण्यात आली असून रु. ६,८८,०००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

माहे मार्च, २०२५ मध्ये प्रादेशिक परिवहन कार्यालय, चंद्रपूर च्या वायुवेग पथकाने केलेल्या तपासणी मोहिमेत एकूण १३ टिप्पर वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. त्यापैकी ६ वाहने प्रादेशिक परिवहन कार्यालयात अटकाव करुन ठेवण्यात आली असून उर्वरित वाहनांना दंडात्मक कारवाईचे चलन देण्यात आलेले आहे.

राख वाहतूकीवर प्रभावी नियंत्रण ठेवणे, विना ताडपत्री वाहतूक करणाऱ्या वाहनांवर नियंत्रण ठेवणे यानुषंगाने प्रादेशिक परिवहन प्राधिकरण, चंद्रपूर यांच्या ठराव क्रमांक ४९/२०२३ अन्वये दिनांक ०१.०१.२०२४ पासून विभागीय कार्यवाही अंतर्गत दंडात्मक / निलंबनाची कारवाई सुरु आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात सायबर गुन्हेगारांकडून होणाऱ्या फसवणूकींना प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(३८) * ७१८० श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.तानाजी मुटकुळे (हिंगोली), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.बापूसाहेब पठारे (वडगाव शेरी), श्री.अमोल खताळ (संगमनेर), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.संजय मेश्राम (उमरेड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.वरुण सरदेसाई (वांद्रे पूर्व) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात गत वर्षात सायबर गुन्हेगारांनी नागरिकांची सुमारे ७,६३४ कोटी रुपयांची फसवणूक केली असून केवळ ११ टक्केच सायबर गुन्हेगारांना पोलिसांनी अटक केली असून अद्यापही ८९ टक्के सायबर गुन्हेगांरावर कोणतीही कारवाई झाली नसल्याची माहिती शासकीय संकेत स्थळावरून माहे मार्च, २०२५ मध्ये निदर्शनास आली असून, गत दोन वर्षात सायबर गुन्हेगारांकडून सायबरबुलिंग, ट्रोलिंग, आणि ऑनलाइन आर्थिक फसवणुक करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, ही खरे आहे काय,
(२) असल्यास, हिंगोली व लातूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात ऑनलाईन व्यवहार होत असल्याने मागील चार महिन्यात सायबर गुन्हेगारांनी २५४ जणांचे लाखो रुपये खात्यातून काढून घेतले असल्याची बाब माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच पालघर जिल्ह्यात सायबर गुन्हेगारांनी नवनवीन युक्त्या वापरून आदिवासींची ऑनलाईन पद्धतीने फसवणूक करून त्यांचे बँक खाते रिकामे केले असून, वसई विरार हद्दीतील शेकडो नागरिकांची जवळपास ९ कोटी रुपयाहून अधिक रकमेची फसवणूक झाल्यामुळे नागरिकांनी क्रेडिट व डेबिटच्या ३३ तक्रारी, ऑनलाइनच्या ३०० तक्रारी व इतर प्रकारच्या ३३८ तक्रारी दाखल केल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, पुणे शहरात सायबर चोरांकडून शेअर मार्केटिंगमध्ये जादा नफा मिळवून देण्याचे अमिष दाखवून व क्रेडिट कार्ड बंद पडणार असल्याचे बतावणी यासह अनेक कारणे सांगून कोट्यवधी रुपयांची फसवणूक तसेच मगरपट्टा सिटी हडपसर येथे भारती शेअर मार्केटमधील गुंतवणुकीवर गॅरेंटेड रिटर्न देण्याचे अमिष दाखवून शहर पोलिस दलातील पोलिस कर्मचाऱ्यांसह दोघांची ५८ लाख ३० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करुन फसवणूक झालेल्या नागरिकांचे पैसे परत मिळवून देण्याबाबत तसेच सायबर गुन्हेगारांवर आळा घालण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०२३ ते मे २०२५ या कालावधीत आर्थिक फसवणूक झालेल्या सायबर गुन्ह्यांची सांख्यिकी माहिती खालील प्रमाणे आहे.

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | अटक आरोपी | फसवणूक झालेली रक्कम (कोटी) | हस्तगत /गोठविलेली रक्कम (कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| २०२३ | ६५८० | ५३९ | ६६० | ५८१.९५ | १०.८० |
| २०२४ | ८९७४ | ९१० | १००७ | ७६३४.२५ | २१.१२ |
| मे २०२५ पर्यंत | २६६८ | २६७ | २८९ | ८८२.९७ | ३५.६६ |

सन २०२३ ते मे २०२५ या कालावधीतील सायबर बुलिंग व ट्रोलिंग संदर्भात दाखल असलेले सायबर गुन्ह्यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | अटक आरोपी |
|---|---|---|---|
| २०२३ | ४७५ | २४८ | २०६ |
| २०२४ | ३७७ | २३५ | १७१ |
| मे २०२५ पर्यंत | १३० | ७२ | ४९ |

(२) हिंगोली जिल्ह्यात माहे जानेवारी ते एप्रिल २०२५ या कालावधीत २२४ नागरिकांनी नॅशनल सायबर क्राईम रिपोर्टिंग पोर्टलवर ऑनलाइन आर्थिक फसवणूक झाल्याबाबत तक्रारी नोंदवल्या आहे. हिंगोली जिल्ह्यात नागरीकांची रू.२,३९,६७,५८१/-इतक्या रकमेची फसवणूक झाली असून त्यापैकी २४,५२,४३२/- इतके रूपये गोठविण्यात यश आले आहे.

लातूर जिल्ह्यामध्ये मागील चार महिन्यामध्ये एकुण ०३ गुन्हे दाखल असून त्यामध्ये १,३४,१७,९४७ रूपयांची फसवणूक झाली आहे.याबाबत पुढील तपास सुरू आहे.

(३) पालघर जिल्ह्यात सन २०२४ मध्ये ५९ गुन्हे दाखल असून आदिवांसीची ऑनलाईन फसवणूक झाल्याबाबत १ गुन्हा दाखल असून २,८५,४९०/- रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. तसेच, ऑनलाईन तक्रारीची संख्या खालील प्रमाणे आहे.

| कालावधी | ऑनलाईन तक्रार संख्या | रक्कम | आदिवासी | |
|---|---|---|---|---|
| | | | तक्रार संख्या | रक्कम रूपये |
| सन २०२४ | २४६७ | १३,०३,९८,३३८/- | १३३ | ४२,८७,८६५/- |
| जाने,२०२५ ते मे,२०२५ | १०९० | ८,५७,८४,६६६/- | ८० | २४,५०,५९३/- |

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अधिनस्त पोलीस ठाण्यात माहे मे २०२५ पर्यंत सायबर संदर्भात दाखल गुन्ह्यांची माहिती खालील प्रमाणे आहे.

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | अटक आरोपी | फसवणुक झालेली रक्कम | गोठविलेली/हस्तगत केलेली रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| मे २०२५ पर्यंत | ४४ | १० | ०१ | ११,३७,६८,९२७/- | ८,९५,४९०/- |

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय अधिनस्त पोलीस ठाणे येथे सायबर संदर्भात आदिवासी लोकांची फसवणूक केल्याबाबत तक्रारी किंवा गुन्हे दाखल नाही.

(४) मगरपट्टा सिटी हडपसर येथे भारती शेअर मार्केटमधील गुंतवणुकीवर गॅरेंटेड रिटर्न देण्याचे अमिष दाखवून आर्थिक फसवणूक केलेबाबत हडपसर पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गु र क्र. ४५०/२०२५ कलम -४२०, ४०६, ३४ भा. द. वि. प्रमाणे गुन्हा दाखल केले असून पुढील तपास सुरु आहे.

सन २०२३ ते मे २०२५ पर्यंतची पुणे शहरामधील गुंतवणुकीच्या फसवणूकी संदर्भातील माहिती खालील प्रमाणे आहे.

| सन | दाखल गुन्हे | उघड गुन्हे | अटक आरोपी | फसवणूक झालेली रक्कम) कोटी( | हस्तगत/गोठविलेली रक्कम) कोटी( |
|---|---|---|---|---|---|
| २०२३ ते मे २०२५ पर्यंत | ८१६ | ४५ | ४३ | ३३३,४०,८२,७३३ | १४,९८,६२,९३८ |

(५) सायबर फसवणूकीच्या प्रकरणांचा तपास जलद गतीने होण्यासाठी तसेच भविष्यात अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी शासनाकडून ठोस उपाययोजना करण्याकरीता महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प हा जागतिक

स्तरावरील एक अत्याधुनिक आणि क्रांतिकारी उपक्रम नवी मुंबई, महापे येथील सायबर मुख्यालयात चालू करण्यात आला आहे. राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी येथे नोडल सायबर पोलीस स्टेशनसह सहा प्रमुख विभाग कार्यरत असतील. महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात आला असून सदर प्रकल्प राज्यातील सायबर सुरक्षा आणि सायबर गुन्हे नियंत्रणासाठी हा एक अत्याधुनिक केंद्रबिंदू ठरेल.

-----------------

**वसई (जि.पालघर) येथील एव्हरशाईन सिटी मधील वसंत नगरी मैदानावर विजेचा शॉक लागून युवकाचा झालेला मृत्यू**

**(३९) * १०३२६ श्रीमती स्नेहा दुबे (वसई) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई (जि.पालघर) येथील एव्हरशाईन सिटी मधील वसंत नगरी मैदानावर भरलेल्या प्रदर्शन व जत्रा महोत्सवामध्ये तिकिट काऊंटरच्या बाजूच्या जाळीला हात लावल्याने वीजेचा शॉक लागून कु.हर्ष प्रकाश सेन या युवकाचा मृत्यू झाल्याची घटना दिनांक १७ मार्च, २०२५ रोजी घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत आचोळे पोलीस ठाणे येथे एफ.आय.आर. क्र.००९८/२०२५, दिनांक १८ मार्च, २०२५ रोजी नोंदविण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी दोन महिन्यांचा कालावधीत उलटूनही कोणतीही कारवाई करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करण्यासह युवकाच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयांतर्गत आचोळे पोलीस ठाणे येथे दि. १८ मार्च, २०२५ रोजी गु.र.क्र. ००९८/२०२५ मध्ये भारतीय न्यायसंहिता, २०२३ मधील कलम १०६(१), ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(३) व (४) सदर गुन्ह्यातील एका आरोपीला दि.१९.०३.२०२५ रोजी अटक करण्यात आली असून उर्वरीत ०२ आरोपींना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ मधील कलम ३५(३) अन्वये नोटीस बजावण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उल्हासनगर (जि.ठाणे) येथे राहणाऱ्या व्यावसायिकाला आंतरराष्ट्रीय कंपनीच्या वेबसाईटवरून फसविल्याबाबत**

**(४०) * ९५३७ श्री.योगेश सागर (चारकोप) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उल्हासनगर (जि.ठाणे) येथे राहणाऱ्या एका व्यावसायिकाला आंतरराष्ट्रीय कंपनीच्या वेबसाईटवरून पैशांची गुंतवणूक केल्यावर अधिक पैसे मिळतील अशा प्रकारचे अमिष दाखवून रुपये २४ लाख ६१ हजार इतक्या रकमेची फसवणूक केल्याचे दिनांक ७ मे, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधिताविरुद्ध कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) होय.
(३) William Sonoma या कंपनीच्या वेबसाईटच्या प्लॅटफॉर्मवर लॉगिंग करून दिवसाचे १,०००/-रू. ते १,५००/- रू. कमावू शकता, असे खोटे आश्वासन देवून तक्रारदारास William Sonoma या इंटरनॅशनल कंपनीच्या बनावट वेबसाईट प्लॅटफॉर्म मध्ये खाते उघडण्यास सांगून त्यामध्ये ऑक्शन म्हणून वेळोवेळी रु.२४,६१,८३६/- घेवून तक्रारदार यांची आर्थिक फसवणूक केली आहे. त्याबाबत दि.०४.०५.२०२५ रोजी विठ्ठलवाडी पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि.नं. ३२६/२०२५, माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ (सी) व ६६ (डी) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## वणी (ता.कळवण, जि.नाशिक) येथील सप्तश्रृंगी गडावर सुरक्षा व्यवस्थेच्या अभावामुळे भाविकांच्या जिवितास निर्माण झालेला धोका

**(४१)** * **७२२९ श्री.धनंजय मुंडे (परळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वणी (ता.कळवण, जि.नाशिक) येथील सप्तश्रृंगी गडावर दिनांक ११ एप्रिल, २०२५ रोजी चैतन्य उत्सवानिमित्त ९ लाख भाविकांनी गर्दी केली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त ठिकाणी सुरक्षा व्यवस्थेच्या नियोजनाअभावी पोलीस व स्थानिक प्रशासन यांच्यात समन्वय नसल्याने भक्तगणांना लाठीमार, गोंधळ व चेंगराचेंगरीचा सामना करावा लागल्यामुळे हजारो भाविकांच्या जीवितास धोका निर्माण झाला, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सप्तश्रृंगी गडावर चुकीचे निर्देश, वाहतूक, अन्नपाणी व्यवस्थेचा अभाव, महिला व बालकांची झालेली अडचण यामुळे शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा निष्प्रभ झाली असून धार्मिक स्थळांवरील सार्वजनिक सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुषंगाने संबंधितांविरुद्ध कारवाई करुन असे गैरप्रकार घडू नये याकरीता कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.

दि.११.०४.२०२५ रोजी चैत्र उत्सव यात्रे निमित्त संपूर्ण सप्तश्रृंगी गड परिसरात एकूण २ ते २.५ लाख भाविकांची गर्दी झाली होती.

सदर ठिकाणी चैत्र यात्रा उत्सवाच्या कालावधीत पोलीस प्रशासन व सप्तश्रृंगी गड ट्रस्ट कार्यालयाकडील सिक्युरिटी गार्ड तसेच एम.एस.एफ. सुरक्षा रक्षक व स्वयंसेवक यांचा कडेकोट बंदोबस्त लावण्यात आल्याने भक्तगणांना लाठीमार गोंधळ व चेंगराचेंगरी असा प्रकार घडला नसून भाविकांच्या जिवितास धोका निर्माण होईल असा प्रकार घडला नाही.

(३) व (४) संपूर्ण यात्रा उत्सव कालावधीत नांदुरी ते सप्तश्रृंगी गड येथे संपुर्ण खाजगी वाहने जाणे येण्याकरिता जिल्हाधिकारी यांचे लेखी आदेशान्वये वाहनास प्रवेश बंद ठेवण्यात येते. ग्रामपंचायत नांदुरी यांच्याकडून सदर ठिकाणी खाजगी वाहनांची पार्किंग व्यवस्था केली जाते.

स्थानिक प्रशासनाकडून महिला व बालके यांचेकरिता आपत्ती व्यवस्थापनासाठी स्वतंत्र पथके तयार करतात. तसेच वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचे महत्वाच्या ठिकाणी कॅम्प लावण्यात येतात.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्यातील विशेषत: नागपूर, यवतमाळ व वर्धा जिल्ह्यात अवैध दारु विक्री सुरु असल्याबाबत**

**(४२) * ११०९२ श्री.संजय देरकर (वणी), डॉ.आशिषराव देशमुख (सावनेर), श्री.राजेश बकाने (देवळी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर जिल्ह्यातील उमरेड, जलालखेडा, केळवद, कुही व कळमेश्वर येथे पोलिसांनी छापे टाकून अवैध मोहफुलाची गावठी दारु, मोहफुलाचा सडवा, दारु बनविण्याचे साहित्य असा एकूण हजारो रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याचे माहे एप्रिल, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच यवतमाळ जिल्ह्यातील मुकुटबन पोलिस स्टेशन हद्दीत तसेच वर्धा जिल्ह्यातील देवळी विधानसभा क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैध दारु विक्री, साठवणूक व वाहतूक सुरु असल्याचे माहे मे, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणांकडे पोलीस प्रशासन दुर्लक्ष करीत असून काही प्रकरणांमध्ये अवैध दारु विक्री करणाऱ्यांसोबत पोलीसांचे संगनमत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणांची शासनाने चौकशी करुन अवैध दारु विक्री व वाहतूक रोखण्यासह विशेष मोहिम राबवून दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याबाबत कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील उमरेड, जलालखेडा, केळवद, कुही व कळमेश्वर येथे एप्रिल २०२५ मध्ये अवैध मोहफुलाची गावठी दारु इत्यादींच्या अनुषंगाने एकूण ४० गुन्हे दाखल केले असुन आरोपींकडून २,६८,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(२) पोलीस अधिक्षक, यवतमाळ यांच्या कार्यक्षेत्रांतर्गत मुकुटबन येथील पोलीसांनी अवैध दारु विक्री, साठवणुक व वाहतुकीच्या संबंधाने मिळालेल्या माहितीच्या आधारे छापे टाकुन मे-२०२४ अखेरपर्यंत २३ गुन्हे नोंद (अटक आरोपी: २३) करून रु. ८१,९२७ इतका मुद्देमाल आणि मे-२०२५ अखेरपर्यंत १० गुन्हे नोंद करून (अटक आरोपी : १३) रु.१,४८,६१३ इतका मुद्देमाल जप्त केला आहे.

तसेच वर्धा जिल्ह्यांतर्गत देवळी विधानसभा क्षेत्रातील देवळी व पुलगांव पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध दारुचा व्यवसाय करणाऱ्यांवर २०२४ मे अखेरपर्यंत ४८१ गुन्हे नोंद करून (अटक आरोपी ४७०) रु.१,८४,४२,६१० इतका मुद्देमाल आणि मे-२०२५ अखेरपर्यंत २६१ गुन्हे नोंद करून (अटक आरोपी : २७३) रु.१,६८,६५,४०० इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(३) व (४) अवैध दारु विक्री, साठवणुक व वाहतुकीच्या संबंधाने पोलीस प्रशासनाकडून दूर्लक्ष न करता मिळालेल्या माहितीच्या आधारे वेळीच छापे टाकून आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये कारवाई करण्यात येत असून उपरोक्त (१) व (२) प्रमाणे गुन्हे नोंदवून कायदेशीर कारवाई करण्यात आलेली आहे.

तसेच, पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे अवैध दारू व्यवसायिकांसोबत संगनमत असल्याची बाब पोलीस तपासामध्ये निदर्शनास आली नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील वाढती गुन्हेगारी तसेच अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार रोखण्याबाबत

**(४३) * ७२१५ श्री.काशिनाथ महादु दाते (पारनेर), श्री.संजय गायकवाड (बुलढाणा), श्री.बाबाजी काळे (खेड आळंदी), श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड), डॉ.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.अनिल मांगुळकर (यवतमाळ) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२१ ते मार्च, २०२५ पर्यंत ३७ हजार गुन्हे दाखल करण्यात आले असून, सरासरी दररोज २४ अल्पवयीन मुलींची छेड तसेच अत्याचार होत असल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खेड (जि.पुणे) तालुक्यातील पोलीस आयुक्तालय व ग्रामीण पोलीस हद्दीत मोठ्या प्रमाणावर कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला असून बलात्कार, अवैध धंदे यावर पोलिस विभागाचे नियंत्रण राहिले नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पुण्यातील कोंढवा परिसरात एका ९ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची घटना दिनांक ३ मे, २०२५ रोजी घडली असून राज्यात अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(४) तसेच माहे जानेवारी ते मार्च, २०२५ या ९० दिवसांच्या कालावधीत बुलढाणा जिल्हयात १८ खून तर ४१ महिलांवर बलात्कार झाले असून, अहिल्यानगर जिल्ह्यात मागील तीन वर्षात अल्पवयीन मुलींवरील अत्याचारात सन २०२२ च्या तुलनेत सन २०२४ मध्ये वाढ झाल्याचे दिनांक १९ एप्रिल, २०२५ रोजी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने राज्यातील वाढती गुन्हेगारी रोखण्यासह महिला व अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेसाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) खरे नाही.

महिलेचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने तिच्यावर हल्ला किंवा गुन्हेगारी बळाचा वापर करणे (भारतीय न्याय संहिता कलम ७४ ते ७८/ भा.दं.वि.३५४) आणि स्त्रीचा विनयभंग करण्याच्या उद्देशाने शब्दोच्चार, हावभाव किंवा कृती करणे (भारतीय न्याय संहिता ७९/ भा.दं.वि.५०९) याबाबतची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :-

| वर्ष | दाखल गुन्हे |
|---|---|
| २०२१ | २६२६ |
| २०२२ | ३५२४ |
| २०२३ | ३८८६ |
| २०२४ | ४४६७ |
| मार्च, २०२५ पर्यंत | ११७९ |

(२) पुणे ग्रामीण पोलीस हद्दीतील प्रत्येक पोलीस स्टेशनमध्ये महिला व मुलींच्या सुरक्षिततेकरिता निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली असून त्याद्वारे गर्दीच्या ठिकाणी पेट्रोलिंग करणे, शाळा / महाविद्यालयांना भेटी देण्यात येतात. तसेच अवैध धंद्यांना प्रतिबंध करण्याकरिता पेट्रोलिंग, कॉम्बींग, नाकाबंदी करण्यात येते तसेच धाडी टाकण्यात येतात.

(३) पुण्यातील कोंढवा परिसरात दिनांक ०३.०५.२०२५ रोजी एका ९ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार झाल्याची घटना निदर्शनास आलेली नाही. तथापि, कोंढवा परिसरातील ५ वर्षीय मुलीवर दिनांक १०.०६.२०२५ रोजी झालेल्या अत्याचारा प्रकरणी कोंढवा पोलीस ठाणे, पुणे शहर येथे गु. र. नं. ४८६/२०२५, भारतीय न्याय संहिता कलम ६४ सह लैंगिक अपराधापासून बालकांचे संरक्षण अधिनियम, २०१२ चे कलम ४, ८ अन्वये दिनांक २१.०६.२०२५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्यातील बालकांवरील अत्याचाराची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :-

| वर्ष | दाखल गुन्हे |
|---|---|
| २०२२ | २०७६० |
| २०२३ | २२३९० |
| २०२४ | २२५७८ |
| मे, २०२५ पर्यंत | १०६६२ |

(४) जानेवारी ते मार्च, २०२५ या कालावधीत बुलढाणा जिल्ह्यात १७ खून व ४३ बलात्काराच्या तक्रारी प्राप्त आहेत.

अहिल्यानगर जिल्ह्यातील मागील तीन वर्षात अल्पवयीन मुलींवरील अत्याचाराची आकडेवारी खालीलप्रमाणे आहे :-

| गुन्हा | दाखल गुन्हे २०२२ | दाखल गुन्हे २०२३ | दाखल गुन्हे २०२४ |
|---|---|---|---|
| बलात्कार (बी.एन.एस. सह पोक्सो कलम ३, ४) | १३७ | १५३ | १८४ |
| विनयभंग (बी.एन.एस. सह पोक्सो कलम ११, १२) | १६७ | १५३ | १८४ |

(५) राज्यातील महिला व अल्पवयीन मुलींच्या सुरक्षिततेकरिता खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात :-

महिलांवर होणाऱ्या अत्याचाराच्या प्रकरणांचा तातडीने निपटारा होण्यासाठी सर्व आयुक्तालय व जिल्हयांमध्ये घटक प्रमुखांच्या नियंत्रणाखाली मुख्यालयाच्या ठिकाणी महिला सहाय्य कक्षाची स्थापना करण्यात आली आहे.

राज्यात महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी निर्भया/दामिनी पथकाची स्थापना करण्यात आली आहे.

महिला व मुली यावरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांची गस्त वाढविणे, पोलीस काका, पोलीस दीदी यांच्या मार्फत जागरुकता निर्माण करणे अशा उपाययोजना करण्यात येत आहेत.

बलात्काराच्या गुन्ह्यांचे ६० दिवसांत मा. न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्याकरिता ITSSO पोर्टलद्वारे देखरेख करण्यात येते.

बलात्कार व ॲसिड हल्यातील पीडित व्यक्तींना मनोधैर्य योजनेतंर्गत आर्थिक मदत दिली जाते.

बाल न्याय अधिनियम, २०१५ अंतर्गत राज्यातील सर्व ४९ पोलीस घटकांमध्ये एकूण ४९ विशेष बाल पोलीस पथक (Special Juvenile Police Unit) कार्यरत आहेत.

पीडित महिलांच्या सहाय्यासाठी राज्यात १२४ महिला समुपदेशन केंद्र कार्यरत आहेत.

राज्यात २० पोक्सो व १२ जलदगती न्यायालय स्थापन करण्यात आलेले आहेत.

डायल ११२ च्या माध्यमातून महिलांना मदत देण्यात येते.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.